तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड, अहिल्यानगर. फोन : 2327060 मो. 9850799850

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहमदनगर, मंगळवार दि. १६.१२.२०२५ अंक नं. २१३ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
फायदाच फायदा !
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02






**'अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५, आता आमच पण ठरलय! : पारिजात चौक मित्र मंडळा'चे फलक**

'अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५, आता आमच पण ठरलय!, पारिजात चौक मित्र मंडळ' असा फलक सावेडी उपनगरातील पारिजात चौकात लावण्यात आला आहे. यात उपरोधक टोला नेमका कोणाला लावण्यात आला आहे, याबद्दल परिसरात चर्चा सुरु आहे. एकविरा चौक ते पारिजात चौक या रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे या रस्त्यासंदर्भातच हा उपरोधक टोला तर नाही ना, असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. (छाया – लोकेश बर्वे)

# राज्यातील तलाठ्यांचे 'बेमुदत आंदोलन'सुरू

नगर – नवा लॅपटॉप आणि प्रिंटर मिळण्यासाठी वारंवार मागणी करूनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने राज्यातील १५ हजार तलाठ्यांनी बेमुदत आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. १५ डिसेंबरपासून ऑनलाइन कामकाजावर तलाठ्यांनी बहिष्कार टाकला असून, यामुळे ई–पीकपाहणी, डिजिटल सातबारा, ई–फेरफारसह सर्व संगणकीय प्रक्रिया रखडणार आहे. याबाबत त जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना तलाठी संघाच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गावपातळीवरील महसुली कामकाजाची प्रमुख जबाबदारी असलेल्या तलाठ्यांवर सध्या कामाचा प्रचंड ताण आहे. सातबारा नोंदणी, फ`रफार, डिजिटल सातबारा, ई–पीक पाहणी, नुकसानीचे पंचनामे, विविध योजनांची अंमलबजावणी अशा अनेक आघाड्यांवर तलाठी एकाचवेळी काम करतात. मात्र, त्यांच्या हातातील साधने जीर्णावस्थेत आहेत. आठ ते दहा वर्षांपूर्वीचे लॅपटॉप, वारंवार सर्व्हर न मिळणे, प्रिंटरअभावी प्रतींचे वितरण न होणे अशा अडचणींमुळे कामकाजावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे तलाठ्यांनी आंदोलनाचे हत्यार उचलले आहे. नवीन लॅपटॉप व प्रिंटर उपलब्ध होईपर्यंत ऑनलाइन कामबंदीचा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आला आहे. परिणामी गावापासून शहरापर्यंतचे महसुली कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे. *(छायाचित्र पान २ वर)*

।। श्री गणेशाय नम: ।।
शुभारंभ
सस्नेह निमंत्रण
हॉटेल स्माईल इन
व्हेज नॉनव्हेज
स्वतंत्र व्हेज किचन
महाराष्ट्रीयन । पंजाबी । साउथइंडियन डिशेस
स्वतंत्र नॉनव्हेज किचन
स्पेशल सावजी मटन । स्पेशल दमबिर्याणी
शुभारंभ
मंगळवार दि. १६/१२/२०२५ रोजी, वेळ : सायंकाळी : ६.०० वाजता.
या शुभ मुहूर्तावर करण्याचे योजिले आहे
तरी आपणासर्वांची उपस्थिती अनिवार्य आहे.
स्थळ : इंडियन ऑईल पेट्रोल पंपाशेजारी, शेंडी बायपास जवळ, नगर–छत्रपति संभाजीनगर रोड, अहिल्यानगर
– शुभहस्ते तथा प्रमुख पाहुणे –
मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप
मा.श्री.अक्षयदादा कर्डिले संचालक : जिल्हा बँक, अहिल्यानगर
मा.श्री.अनिलजी मोहिते शहर जिल्हाध्यक्ष, भाजपा अहिल्यानगर
सौ. गीतांजली काळे मा. उपमहापौर
मा.श्री.रमेशजी अनभुले मा.कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग, अहिल्यानगर
मा.श्री.सुहास मुळे अध्यक्ष : जागरुक नागरीक मंच
✲ आपले विनित ✲
दामोदर बठेजा, सागर बठेजा, तेजस काळे, दिग्विजय अनभुले

जागा भरणे आहे
● मॅनेजर – २ जागा
● सोने विभाग – १ जागा ● चांदी विभाग – १ जागा
(सराफी पेढीचा किमान ५ वर्षे अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य)
● कॉम्प्युटर ऑपरेटर – १ जागा
(Account S/W किमान २ वर्षे अनुभव आवश्यक)
● सेल्समन – २ जागा ● सेल्सगर्ल – २ जागा
सराफी पेढीचा किमान २ वर्षे अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.
विजय भागिरथ रायमोकर सराफ
गोल्डन टॉवर, सराफ बाजार,
अहिल्यानगर मो : 9850199991
(AURUS ADVT)

जागा भाडे तत्वावर देणे आहे.
सावेडी साई मिडास बिल्डींग
पहिला मजला, नगर–मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
मासिक भाडे : रूपये 30/- प्रती स्क्वे.फुट
एकुण जागा : 5000 स्क्वे.फुट
सावेडी साई मिडास बिल्डींग
पुर्ण ऑफिस एसी व फर्निचर सहित
दुसरा मजला, नगर–मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
मासिक भाडे : रूपये 50/- प्रती स्क्वे.फुट (फर्निचर सहित)
एकुण जागा : 3200 स्क्वे.फुट
केडगांव हॉटेल Te-Amo शेजारी
40 हजार स्क्वे.फुट प्लॉट मधील पक्के बांधकाम असलेले शेड
मासिक भाडे : रूपये 13/- प्रती स्क्वे.फुट
पत्ता : नगर–पुणे रोड, केडगांव, अहिल्यानगर
एकुण शेडची जागा : 12800 स्क्वे.फुट
संपर्क : 9545453867

वरदग्रीन्स रिसॉर्ट
शुद्ध शाकाहारी
अहिल्यानगरमधील सर्वोत्तम हुरडा पार्टी
बुकिंग आवश्यक
निसर्गरम्य वातावरणात । कवळा लुसलुशीत हुरडा सोबत नाष्टा । जेवणाची । हायटीची उत्कृष्ट व्यवस्था
मु,पो,चास,आर,आर,पेट्रोल पंप मागे,नगर–पुणे रोड,अहिल्यानगर.
संकलेचा सौरभ 9637539797

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com





दिव्यांग कर्मचारी अधिकारी संघटनेचा जिल्हा मेळावा उत्साहात झाला. यावेळी कोतवाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचे दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# वारंवार होणाऱ्या दिव्यांगत्व पडताळणी प्रक्रियेला तीव्र विरोध; उगीच नाहक त्रास देणे बंद करावे अन्यथा 'आंदोलन' करणार

## दिव्यांग कर्मचारी अधिकारी संघटनेचा जिल्हा मेळाव्यात इशारा

नगर – महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी अधिकारी संघटना, मुंबई ३२ या शासनमान्यता प्राप्त संघटनेचा मेळावा नगरमध्ये पार पडला. राज्य सह कोषाध्यक्ष संतोष सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात सध्या शासनाकडून सुरू असलेल्या दिव्यांगत्व पडताळणी प्रक्रियेविषयी तीव्र विरोध दर्शविण्यात आला. ही प्रक्रिया किती वेळा राबवायची याला कुठेतरी मर्यादा असायला हवी. दिव्यांग प्रमाणपत्राची कायमस्वरूपी वैधता असणाऱ्या दिव्यांगांमध्ये सुधारणा होण्याची शक्यता नसते (उदा. हात/पाय गमावणे, डोळ्याची दृष्टी गमावणे) त्यांना कायमस्वरूपी वैधतेचे प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे, जेणेकरून नूतनीकरणाची गरज भासणार नाही, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

सौम्य अपंगत्वासाठी किंवा केवळ नूतनीकरणासाठी प्रत्यक्ष उपस्थितीची सक्ती न करता, ऑनलाइन कागदपत्रे सादर करण्याची व्हिडिओ कॉल द्वारे सोय उपलब्ध करावी. जिल्हा/तालुका स्तरावर अधिकार तपासणी आणि प्रमाणपत्र वितरण/नूतनीकरणाचे पूर्ण अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक किंवा जिल्हा पातळीवरील वैद्यकीय मंडळाला देण्यात यावेत, जेणेकरून लांबचा प्रवास करण्याची गरज टळेल. शासनाने जबाबदारी निश्चित केलेल्या वैद्यकीय अधिकारी तज्ज्ञांनी स्वतःची भूमिका ही दिव्यांग सहानुभूती न ठेवता स्वतःची जबाबदारी निश्चित करून बोगस आणि शंकास्पद प्रमाणपत्रे वितरित होऊ देऊ नयेत. प्रशासकीय बाबी सरल आणि सुलभ करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करून सर्व वैद्यकीय आणि प्रशासकीय प्रक्रिया एकाच ठिकाणी सुव्यवस्थित कराव्यात, जेणेकरून वेगवेगळ्या विभागांमध्ये वारंवार जावे लागणार नाही. यामुळे वेळेची बचत आणि आर्थिक बोजा कमी होईल. वारंवार तपासणीमुळे दिव्यांगांचा अमूल्य वेळ आणि प्रवासाचा मोठा खर्च होतो. हे मानवाधिकार आणि आर्थिक न्यायाचे उल्लंघन आहे, असे शासनाच्या निदर्शनास आणून देण्याची ठरले आहे.

राज्य सह कोषाध्यक्ष संतोष सरवदे यांनी भूमिका घेऊन वारंवार तपासणी ही दिव्यांगांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन असून, ती त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर विपरित परिणाम करते. त्यामुळे, कायमस्वरूपी अपंगत्वासाठी कायमस्वरूपी प्रमाणपत्र आणि इतर प्रकरणांसाठी डिजिटल आणि विकेंद्रीकृत तपासणी प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी. उगीच दिव्यांगांना नाहक त्रास देणे बंद करावे. अन्यथा यासाठी फार मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

जिल्हा कार्यकारिणीची पुनर्रचना लवकरच करण्यात येणार असून, त्या अनुषंगानेही सकारात्मक चर्चा झाली. लवकरच सभासदांचा डेटा बेस तयार करून नियुक्ती अधिकारी यांना दिला जाईल. अशाप्रकारे संघटनेच्या भविष्यातील दिशा, धोरणे आणि कार्यपद्धती यावर उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. मेळाव्यास सभासद बाळासाहेब चव्हाण, सोपान शेटे, स्वप्नील शिंदे, अनिल ओहळ, भाऊसाहेब लाड, श्रीकांत दळवी, राजेंद्र वाबळे, योगेश सूर्यवंशी, नेहुल महेश, शरद घुले, महेश जाधव, सोमनाथ रोहकले, अमोल चन्ने, किरण माने, गजानन मुंडलिक, अहिरे भरत, राजेंद्र ठुबे, दत्तात्रय हजारे, प्रवीण एडके, शेख रियाज, अशोक सोनवणे, किशोरी भोर, सुंदरबाई फलके, अनिता जंबे, रोहिणी लगड आदी उपस्थित होते.

### पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचा सत्कार

कोतवाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचे दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळ्यातील आरोपींना पकडून अत्यंत कौतुकास्पद आणि धाडसी कामगिरी केली आहे. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि कठोर परिश्रमामुळे गोरगरीब व गरजू दिव्यांगांचा विश्वास वाढला आहे. त्यांचे हे कार्य कायदा आणि सुव्यवस्थेसाठी प्रेरणादायी आहे. यावेळी उपस्थित दिव्यांग कर्मचारी संघटना राज्य सहकोषाध्यक्ष संतोष सरवदे आणि शिर्डी संस्थान मधील दत्तात्रय हजारे यांनी त्यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.




डॉ. दीपक हरके यांना ट्रेंडसेटर्स अ‍ॅवॉर्ड २०२५ ने सन्मानित करताना अभिनेत्री सोहा अली खान.

# ट्रेंडसेटर्स अ‍ॅवॉर्ड २०२५ ने डॉ. दीपक हरके सन्मानित

नगर – मुंबई येथील जिंजर हॅटेल मध्ये टाईम्स पलॉड मीडियाच्या वतीने देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा ट्रेंडसेटर्स अ‍ॅवॉर्ड २०२५ ने गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यामध्ये अभिनेत्री सोहा अली खान यांच्या हस्ते जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल ट्रेंडसेटर्स अ‍ॅवॉर्ड २०२५ ने सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या मोटिवेशनल स्पीकर बी के तपस्विनी उपस्थित होत्या.

# नगरमध्ये १८ डिसेंबरला मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – शहरात तारकपूर येथील सिटी केअर हॉस्पिटलमध्ये १८ डिसेंबर रोजी मोफत हृदय रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. नगरमधील शिबिरासाठी ७३८५१९५९६२, ९२०९६३२५०२ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर महापालिका निवडणुकीसाठी १९ डिसेंबर रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती



गजेंद्र राशिनकर

नगर – अहिल्यानगर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून प्रभाग क्र.१ ते १७ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती १९ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे, अशी माहिती शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांनी सांगितले.

या मुलाखती अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष सचिन डफळ, शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर, शहर सचिव डॉ.संतोष साळवे, महिला जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड.अनिता दिघे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड तसेच पक्षाच्या निवडणूक समितीच्या उपस्थितीत १९ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत सिद्धीबागेसमोरील जाधव हाईटस् येथील मनसे कार्यालयामध्ये पार पडतील.

मुलाखतीला येण्यापूर्वी संबंधित उमेदवारांनी पक्षाकडे अर्ज करणे बंधनकारक आहे. आवश्यक ती स्वतःची सर्व मूळ कागदपत्रे (उदा. शैक्षणिक, निवडणूक संबंधित, वैयक्तिक) सोबत ठेवावीत.

अहिल्यानगर शहराच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी पक्षाकडून लढण्यास इच्छुक असलेल्या सर्व उमेदवारांनी, कार्यकर्त्यांनी याची नोंद घावी, अशी माहिती राशिनकर यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी नाशिक विभागीय अध्यक्ष गणेश जाधव, राज्य उपाध्यक्ष संतोष तनपुरे, जिल्हाध्यक्ष प्रशांत हासे, सरचिटणीस महेश सुद्रिक, कार्याध्यक्ष सोपान गायकवाड निवेदन देताना.

## द्वारकाबाई चिमटे यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – आदर्शनगर, कल्याण रोड येथील रहिवासी सौ. द्वारकाबाई चिमटे (वय ६१) यांचे १६ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भाळवणी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रसाद, शितल, दिपा यांच्या त्या मातोश्री तर रंगनाथ चिमटे यांच्या पत्नी होत.

## कांतीलाल पितळे यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – नांगरे गल्ली येथील रहिवासी कांतीलाल पन्नालाल पितळे (वय ८५) यांचे १६ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ५ पुतणे असा परिवार आहे. संपत, मदन, अमृत, प्रशांत, किरण पितळे यांचे ते काका होत.

## शांताबाई भळगट यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील सिव्हील हडको परिसरातील रहिवासी श्रीमती शांताबाई हस्तीमल भळगट (माशीजी) (वय ८५) यांचे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर १६ डिसेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सुरेखाबाई कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



जामखेड – येथील रहिवासी श्रीमती सुरेखाबाई सुभाषलाल कोठारी (वय ८८) यांचे १५ डिसेंबर रोजी रोजी दीर्घ आजाराने उपचारा दरम्यान पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जामखेड अमरधाम येथे करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार राजेंद्र कोठारी यांच्या त्या मातोश्री तर संजय कोठारी यांच्या चुलती होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अन्यायकारक मालमत्ता कराच्या नोटीसींबाबत योग्य निर्णय घ्यावा अन्यथा 'तीव्र जनआंदोलन'

## राष्ट्रीय पक्ष आम आदमी पार्टीचे मनपा आयुक्तांना निवेदन

नगर – शहरातील नागरिकांना देण्यात येत असलेल्या सुधारित मालमत्ता कराच्या नोटिसांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी असून या नोटिसा अन्यायकारक असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय पक्ष आम आदमी पार्टी अहिल्यानगरच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पार्टीचे शहराध्यक्ष भरत खाकाळ यांच्यासह दिलीप घुले, महिला अध्यक्ष विद्या शिंदे, राजू गुजर, संदीप पखाले, राम शिंदे, सुनील ठाकरे, मच्छिंद्र शिंदे, सिताराम खाकाळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, अनेक नागरिकांना यापूर्वी भरत असलेल्या मालमत्ता कराच्या तुलनेत पाचपटीने वाढीव कराच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी शेजारी झालेल्या बांधकामाचा वाढीव कर चुकून इतर नागरिकांच्या नावावर टाकण्यात आलेला आहे. बहुतांश ठिकाणी मालमत्ताधारक उपस्थित नसताना सर्वेक्षण करण्यात आले असून, दुसऱ्या व्यक्तींच्या माहितीवर आधारित चुकीच्या पद्धतीने वाढीव कर आकारण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. नोटिसांमधील दरवाढ ही चुकीच्या वर्गीकरण पद्धतीने करण्यात आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

प्रभाग क्रमांक सहा व सातमध्ये नियमित व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नाही. रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून कचरा, गटारी, तुंबलेल्या नाल्या व स्वच्छतेच्या समस्या कायम स्वरूपी आहेत. शहरातील चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव असून अनेक ठिकाणी पथदिवे व लाईट उपलब्ध नाहीत. सरकारी शाळांची अवस्था चिंताजनक असून ज्येष्ठ नागरिक, महिला, अंध व दिव्यांगांसाठी घरपोच सुविधांचा अभाव आहे. अशा अनेक मूलभूत समस्या प्रलंबित असताना सुविधा देण्याऐवजी नागरिकांवर मोठ्या प्रमाणात करवाढ लादणे हा अन्याय असल्याचे पार्टीने स्पष्ट केले.




अन्यायकारक मालमत्ता कर नोटीसींविरोधात वेळेत योग्य निर्णय घेण्याच्या मागणीचे निवेदन आम आदमी पार्टीच्यावतीने आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

चुकीच्या नोटिसा तात्काळ रद्द कराव्यात, त्रुटी असलेल्या प्रकरणांचे दुबार सर्वेक्षण करताना महानगरपालिकेचा कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी दोघेही उपस्थित असावेत, तसेच कंत्राटी पद्धतीचा आढावा घेऊन आवश्यक असल्यास ती रद्द किंवा योग्य नियोजन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मालमत्ता कर वाढ मान्य नसून याबाबत महापालिकेने लेखी निर्णय द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेळेत योग्य निर्णय न घेतल्यास प्रभाग क्रमांक सहा व सातसह संपूर्ण शहरातील नागरिकांना सोबत घेऊन आम आदमी पार्टी तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### महानगरपालिकेची निवडणूक लढविणार : संपर्काचे आवाहन

महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रीय पक्ष आम आदमी पार्टी सर्व प्रभागांमधून आपले सर्व उमेदवार उभे करणार असून इच्छुकांनी शहर अध्यक्ष भरत खाकाळ (मो.९८९०७४९१९७), महिला अध्यक्षा अ‍ॅड. विद्या शिंदे (९५८८६०६३६४) यांच्याशी संपर्क साधावा.

# भाविकांच्या सुरक्षिततेसाठी 'शिर्डी कृती आराखड्या'ची प्रभावी अंमलबजावणी करा : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

## सिंहस्थ कुंभमेळा नियोजन आढावा बैठक; जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले सादरीकरण

शिर्डी – नाशिक येथे २०२६-२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तयार केलेला 'शिर्डी कृती आराखडा' सर्वसमावेशक आहे.भाविकांची सुरक्षा, आरोग्य व वाहतूक नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देत या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी शिर्डी येथे आयोजित बैठकीत मुख्य सचिव श्री. अग्रवाल बोलत होते. या बैठकीला नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर व उपविभागीय अधिकारी माणिक आहेर आदी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सादरीकरणाद्वारे तयारीचा सविस्तर माहिती सादर केली. नाशिक कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या एकूण भाविकांपैकी सुमारे २० ते २५ टक्के भाविक शिर्डी व शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. यामध्ये वाहतूक, पार्किंग, आरोग्य व आपत्ती व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे. कुंभमेळा कालावधीत शहरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी 'एकात्मिक वाहतूक आराखडा' तयार करण्यात आला आहे. त्यानुसार शहराबाहेर व मंदिरालगत सुमारे ९४ हेक्टर क्षेत्रावर ८ नवीन पार्किंग स्थळे निश्चित करण्यात आली असून, तेथे स्मार्ट पार्किंग व शटल बस सेवेचा समावेश असेल.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णवाहिका व अग्निशामक दलाच्या गाड्या अवघ्या १५-२० मिनिटांत घटनास्थळी पोहोचण्यासाठी 'ग्रीन कॉरिडॉर'ची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच, गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करत संवेदनशील ठिकाणांवर ड्रोन व सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवली जाईल.



सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी शिर्डी येथे आयोजित बैठकीत मुख्य सचिव श्री. अग्रवाल बोलत होते. या बैठकीला नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आदी.

भाविकांच्या मदतीसाठी व गर्दी नियोजनासाठी विशेष प्रशिक्षित 'क्राउड मार्शल्स' (Crowd Marshals) तैनात करण्यात येणार आहेत. आरोग्य सुविधेच्या दृष्टीने श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व परिसरातील इतर रुग्णालये सुसज्ज ठेवण्यात येणार असून, अग्निशमन दलासाठी नवीन मल्टीपर्पज वाहने व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने शिर्डी विमानतळाची क्षमता वाढवून दररोज २० उड्डाणांचे नियोजन तसेच देशभरातील १३ प्रमुख शहरांशी थेट रेल्वे कनेक्टिव्हिटीचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय प्रवाशांच्या सोयीसाठी नाशिककरिता २००, तर छत्रपती संभाजीनगर व पुण्यासाठी प्रत्येकी ४० जादा बसेसचे नियोजन आहे. शनिशिंगणापूर येथेही स्वतंत्र पार्किंग व दर्शन रांगेचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रशासनाच्या या सर्वंकष नियोजनाचे मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी कौतुक करत, सर्व विभागांनी समन्वयाने काम करून भाविकांना सोयी-सुविधा देण्याचे काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# गृहिणी

## आरोग्य

### छातीतील जळ करा दूर

अन्न खाल्ल्यानंतर अनेकदा छातीत जळजळ सुरू होते. ही एक सामान्य समस्या आहे जी बऱ्याच लोकांना त्रास देते. वास्तविक, अन्न पचनाच्या प्रक्रियेत, आपले पोट असे ॲसिड तयार करते जे अन्न पचण्यास मदत करते. पण कधी कधी हे ॲसिड जास्त प्रमाणात तयार होते त्यामुळे छातीत जळजळ होण्याचा त्रास होतो. जेवणानंतर गोड म्हणून गूळ दिला जातो . गूळ आपल्या पोटासाठी खूप फायदेशीर मानला जातो. हे पचन प्रक्रियेला गती देते आणि पोटात ॲसिड तयार होण्यास प्रतिबंध करते. जर आपण ॲसिडिटीच्या समस्येने हैराण असाल तर जेवणानंतर थोडा गूळ खाऊन एक ग्लास पाणी प्या.

## पाककला

### फणसाचे लोणचे

**साहित्य** – ५०० ग्रॅम फणस, २५० मिली मोहरीचे तेल, चवीनुसार मीठ, १ चमचा हळद पावडर, २ चमचे लाल तिखट, २ चमचे मोहरीची डाळ, २ चमचे बडीशेप, १ चमचा मेथीचे दाणे, १/२ चमचा हिंग, २ चमचे व्हिनेगर

**कृती :** फणस सोलून त्याचे तुकडे करा आणि हलके उकळा आणि चांगले वाळवा. सर्व मसाले घाला आणि चांगले मिसळा. मोहरीचे तेल गरम करा आणि थंड करा आणि लोणच्यात घाला. शेवटी व्हिनेगर घाला आणि मिसळा आणि एका भांड्यात भरा आणि ३-४ दिवस उन्हात ठेवा. स्वादिष्ट फणसाचे लोणचे तयार आहे.

**टिप :** प्रथम फणसाचे तुकडे नीट धुवा. नंतर थोडे मीठ आणि पाणी घाला आणि स्टीमरमध्ये सुमारे १० मिनिटे शिजवा जेणेकरून ते मऊ होतील. त्यानंतर ते गाळून घ्या आणि पूर्णपणे थंड होऊ द्या. लोणच्यात ओलावा राहू नये म्हणून हे महत्वाचे आहे. मेथीचे दाणे, बडीशेप आणि मोहरी तेल न घालता पॅनमध्ये हलके तळा जेणेकरून त्यांचा सुगंध येईल. आता ते थंड करा आणि बारीक बारीक करा. आता त्यात हळद, तिखट, मीठ आणि हिंग घाला. उकडलेले सुके फणसाचे तुकडे एका मोठ्या भांड्यात ठेवा आणि त्यावर सर्व मसाले चांगले मिसळा जेणेकरून प्रत्येक तुकडा मसाल्यांनी लेपित होईल.

## वास्तू

✻ दर शनिवारी घराच्या उंबरठ्यावर गोमूत्रामध्ये हळद कालवून त्याचा शिंपडा करावा आणि त्याचा पट्टा ओढावा.

✻ आंघोळ झाल्यावर रोज मुंग्यांना साखर घालावी.

✻ रोज वास्तू देवतेला न चुकता नैवेद्य दाखवावा.

✻ दर अमावस्येला तिन्ही सांजेला घरावरून दही भाताची मूद सात वेळा उतरवून रस्त्यावर टाकावी.

## सल्ला

रात्री उरलेली चपाती सकाळी शिळी दुधासोबत खाल्ल्याने अपचन, गॅस, ॲसिडिटी या आजारांपासून आराम मिळतो.

## सौंदर्य

पुदिन्याच्या पानांचा रस चेहऱ्यावर लावल्याने चेहरा मुलायम आणि कोमल बनतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५

**प्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, विशाखा १७।१२, सूर्योदय ०६ वा. ४५ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**वृषभ :** जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**कन्या :** आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**तूळ :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर :** घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.


**कुंभ :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३२६

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) येणेजाणे; राबता; शेत; रान ४) हार; पराजय; अपयश; असफलता ६) रामाला वनवासात या जंगलात राहवे लागले ८) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय ९) एक मराठी आडनाव १२) दुरून लक्ष ठेवणे; दुरून केलेली बारकाईची पाहणी १४) आश्चर्यकारक; नवलाचे १६) जखमेतून वाहणारा द्रव; सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध १८) शीख धर्माचे संस्थापक १९) या पिकापासून गोणपाट तयार होते २०) वृष्टी; मारा; पाऊस २१) एक फळ; कलिंगड २३) उपहास; फजिती; हुर्यो २४) गेलेला; भूत; अवस्था; दशा

**उभे शब्द :-** १) वाद; तंटा; भांडण; कलह २) एक झाड; वटवृक्ष ३) कागदाचा चतुर्थांश स्तंभ ४) विकावयाचे ५) गोदाम; कोठार (लाकडाचे) ७) जुने फाटके वस्त्र; लकतर; चिंधी ९) तांबडी फुले येणारा एक वृक्ष १०) किराणा दुकानदार; जीभ; जिव्हा ११) समुद्राच्या लाटांचा आवाज १३) नीच मनोवृत्तीचा १४) राजस्थानातील प्रसिद्ध पर्वत १५) रचना; नकली; घडण १७) फळातील रसाळ भाग; गर १९) डोला; ताजा (मोहरममधील) २२) पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र; मस्ती; जोर

शब्दगंध क्र. ७३२५ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जे काम इतरांना सांगण्यासारखे आहे ते उद्यावर ढकलू नका.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पुरुषांनाही स्तनाचा कर्करोग होतो का?

हे खरे आहे की स्तनाचा कर्करोग सामान्यतः महिलांमध्ये आढळतो, परंतु पुरुषांनाही हा आजार होऊ शकतो. जरी तो दुर्मिळ असला तरी, पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग एकूण प्रकरणांपैकी एक छोटासा भाग आहे. पुरुषांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता जास्त असते कारण त्यांचे निदान बहुतेकदा प्रगत टप्प्यात होते (जेव्हा कर्करोग शरीराच्या इतर भागात पसरलेला असतो), तर महिलांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता कमी असते. स्तनामध्ये लालसरपणा, पिंपल्स (संत्र्याच्या सालीसारखे) किंवा स्तनाच्या त्वचेचे आकुंचन हे देखील स्तनाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.

कर्करोग काखेतील लिम्फ नोड्समध्ये पसरू शकतो, ज्यामुळे तेथे गाठ किंवा सूज येऊ शकते. जरी गाठी बहुतेकदा वेदनारहित असतात, तरी काही पुरुषांना स्तनात वेदना किंवा अस्वस्थता जाणवू शकते. सर्वात सामान्य लक्षण म्हणजे गाठ सहसा वेदनारहित असते आणि स्तनाग्राजवळ जाणवू शकते.

जर तुम्हाला तुमच्या स्तनात नवीन गाठ किंवा सूज दिसली तर ताबडतोब डॉक्टरांना भेट द्या. स्तनाग्रातून रक्त किंवा इतर स्त्राव, बुडलेले (उलटे) स्तनाग्र, किंवा स्तनाग्रभोवतीच्या त्वचेवर लालसरपणा, फुगवटा किंवा फोड येणे हे देखील एक धोक्याचे लक्षण असू शकते.

### नंदा

मेरुपर्वतावर पुष्कर तीर्थी सरस्वती नदी वाहते. तिथे तिला नंदा असेही म्हणतात. त्याची कथा अशी आहे पूर्वी प्रभंजन नावाचा राजा होता. तो पुष्कर वनात शिकारीसाठी आला असता आपल्या पाडसाला दूध पाजणाऱ्या एका हरिणीची त्याने शिकार केली. हरिणीच्या शापाने तो पशुयोनीत जाऊन वाघाच्या जन्माला आला. आजपासून शंभर वर्षांनी नंदा नावाच्या गायीशी तुझे बोलणे होईल व हा शाप संपेल, असे हरिणी म्हणाली. हा वाघ मोठा भयंकर असून रानातील येणाऱ्या जाणाऱ्या प्राण्यांची हिंसा करी.

शंभर वर्षांनी गायींचा एक मोठा कळप तेथे वास्तव्यास आला. त्यातील नंदा नावाची एक गाय भटकत भटकत वाघाजवळ आली. वाघ तिला मारून खाण्याचा विचार करू लागला. घरी असलेल्या वासराच्या आठवणीने ती व्याकूळ झाली. त्याला एकदा दूध पाजून, प्रेमाने चाटून आपल्या सख्यांच्या स्वाधीन करून मग मी स्वतः तुझ्याकडे येईन व मग तू मला खा, अशी नंदाने विनंती केली. वाघाने दयाळू होऊन ती मान्य केली. ठरल्याप्रमाणे ती परत निघाली, तेव्हा इतर गायींनी तिला आत्मरक्षणासाठी खोटे बोलल्यास पाप नाही वगैरे सांगितले. पण सत्य हेच उत्तम तप आहे असे म्हणून नंदा वाघाकडे निघाली.

तिच्या पाठोपाठ तिचा बछडाही आला. त्यांना पाहून गायीचे ते सत्याचे वागणे पाहून वाघाने तिला मारण्याचा विचार सोडला. उलट आजपर्यंत आपण केलेल्या हत्यांच्या पातकातून मुक्त होण्यासाठी उपाय विचारला.

गायीने त्याला कलीयुगाचा जो धर्म दान त्याची आठवण देऊन सर्वांना तू अहिंसेचे दान दे असे सांगितले. वाघाने तिला आपल्या पूर्वजन्मीची हकिगत सांगितली व तिचे नाव विचारले. नंदा नाव ऐकताच प्रभंजनाची शापातून मुक्तता झाली. त्या वेळी सत्यवचनी नंदेचे दर्शन घेण्यासाठी साक्षात यमधर्म तेथे आला व संतुष्ट होऊन वर माग' म्हणाला. ही सरस्वती नदी आजपासून नंदा या नावाने ओळखली जावी व हे स्थान मुलींना 'धर्म प्रदान करणारे तीर्थ व्हावे असा वर तिने मागितला. तिला तिच्या वासरासहित उत्तम पद प्राप्त झाले.

## जीवन का अमृत (भाग १)



हर दुःख, दर्द का यही एक इलाज है। यह स्वर्ग के साम्राज्य का रास्ता खोलने की कुंजी है । समर्थ सतुरु से नामदान ले लेने के बाद, शिष्य का सच्चे घर पहुँचना पक्का हो जाता है । जो नाम लेने के बाद भी पापों और बुराईयों से भरी जिंदगी जीते है और संसार में लिप्त रहते हैं, वे स्त्री या पुरुष के रुप में दोबारा जन्म लेंगे और इस रास्ते की तरक्की को आगे बढ़ाएँगे। पर जिन्हें सतुरु से तीव्र प्रेम है, अटूट विश्वास है और वे तरक्की कर रहे हैं, वे दोबारा जन्म नहीं लेंगे। उन्हें अंतर के निचले मंडलों में बैठा दिया जाता हैं, जहाँ पर सतुरु की सहायता से, वे तरक्की कर अंत में अपने निज घर पहुँच जाते हैं। आमतौर से एक शिष्य इस प्रक्रिया में चार जन्म लेता है,

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

पर यह प्रक्रिया एक जन्म में भी खत्म हो सकती है, जो कि शिष्य के प्रेम, आस्था और सतुरु के आज्ञापालन पर निर्भर करता है।

अध्याय-२ - ध्यान - अभ्यास

१. मुझे खुशी है कि सभा में लगभग १३० व्यक्ति अलग-अलग जगहों से आए और जब आप हर एक का, अपने-अपने स्थान पर बैठने का इंतजार कर रहे थे, तो आपने सतुरु को कमरे में प्रवेश करते हुए और मुड़कर सबकी ओर मुस्कुराते हुए देखा। आपने नामदान से पहले भी सतुरु को आते देखा, पूर्णतया सफेद पोशाक में, सफेद कोट पहने और सबको मीठी मुस्कान देते हुए। सतुरु हमेशा अपने बच्चों के साथ हैं, जो सभी उसे प्यारे हैं। जब एक से ज्यादा भाई-बहन उसकी प्यार भरी याद में मिलते हैं, तो उसकी दया ज्यादा व्यावहारिक हो जाती है और धन्य हैं वे लोग, जो उसकी दया का फायदा उठाते हैं। मुझे खुशी है कि जब भी आप भजन-सिमरन में बैठते हैं, आप सुनहरे प्रकाश में सतुरु को देखते हैं। आप स्वयं को धन्य समझें और अपने आध्यात्मिक अभ्यासों और सतुरु से प्रेम करने में अधिक नियमित और समर्पित हो जाएँ। यह प्रेम, भक्ति और पूर्ण समर्पण का रास्ता है । जब भी आप सतुरु के नूरी और लुभावने स्वरुप को अंतर में देखें, तो उसके प्यारे चेहरे में खो जाएँ, ताकि आप स्वयं को पूरी तरह भूल जाएँ । तब वह आपसे बातें करेगा और आगे आपका मार्गदर्शन करेगा ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अभी संसार नहीं बदल रहा उसका कारण और कुछ नहीं सिर्फ हम मन से नहीं बदले हैं। हम सिर्फ बोलते अच्छा हैं मन से वैसे नहीं हैं। इसलिये लोग भी बोलते अच्छा हैं, करते उल्टा हैं। याद रखो लोग वह बनते हैं, जो आप वास्तव में हैं। न कि वह, जो आप बोलते वा सिखाते हैं। अगर आप डरपोक हैं, आलसी हैं, स्वार्थी हैं, पक्षपाती हैं, प्रचारक हैं, योगी नहीं परंतु क्रोधी हैं, शांत नहीं परंतु ईर्ष्यालू हैं, स्नेही व सहयोगी नहीं हैं तो लोग वही बनेंगे जो आप वास्तव में हैं, चाहे आप कितना भी अपने को छुपा लें। इसलिये अपने मूल गुणों, शांति, प्रेम, सुख, आनंद के संकल्पों में रहो, क्योंकि बिना जाने भी लोग, ईथर के माध्यम से आप से प्रभावित हो रहे हैं।

आज्ञा चक्र - २६- मन- केन्द्र / यंत्र

भगवान ने हरेक मनुष्य को मन के रुप में एक अनमोल खजाना दे रखा है। मन कार्य कैसे करता है, किसी को कोई कुछ पता नहीं। बस

### आज्ञा चक्र

सब अपने अपने ढंग से इसकी व्याख्या कर रहे हैं। बहुत अच्छी व्याख्या करते हैं फिर भी परेशान रहते हैं। परेशानी सिद्ध करती है कि मन के ज्ञान की कमी है। विद्युत शक्ति इस विश्व की महान शक्ति है। विद्युत को जब हीटर से गुजारते हैं तो गर्मी उत्पन होती है। विद्युत जब ए.सी. से गुजरती है तो ठंडक पैदा होने लगती है। बल्ब से गुजरती है तो रोशनी होने लगती है। कम्पयूटर अनेक असम्भव कार्य करने लगता है। मन एक अनोखा कंप्यूटर है। यह अनोखा यंत्र है। इस को आज तक कोई नहीं समझ सका । इसे अगर हम समझ जायें तो इस विश्व और मानव जीवन में क्रांति आ सकती है। हमारे दिमाग में अनेक केन्द्र/यंत्र बने हुये हैं जो स्थूल यंत्रों की तरह काम करते हैं। यह जो पांच विकार हैं जिन्हें हम काम (सेक्स), क्रोध, लोभ, मोह, अहंकार कहते हैं।

वास्तव में ये हमारे मन में यंत्र हैं जिसे हम केन्द्र कह सकते हैं। जैसे ही हमें अपवित्रता की कशिश होती है हमारे विचार काम केन्द्र से गुजरने लगते हैं और इस केन्द्र से ऐसी तरंगे पैदा होती हैं जो विपरीत लिंग के प्रति आकर्षण पैदा करती हैं। जब क्रोध की परिस्थिति आती है तो हमारे विचार क्रोध केन्द्र / यंत्र से गुजरने लगते हैं। इस केन्द्र का स्वभाव है क्रोध पैदा करना जिस से दिमाग गर्म होने लगता है। हम आग उगलने लगते हैं। ऐसे ही लोभ, मोह तथा अहंकार के केन्द्रों/यंत्रों से जब हमारे विचार गुजरते हैं तो वैसा ही वातावरण बनने लगता है। सूक्ष्म विकार ईर्ष्या, द्वेष, नफरत, आलस्य, झूठ बोलना, ग्लानि करना ये सब कुछ नहीं है, ये सब भी यंत्र हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

यमदूत : बाई...चला तुमची वेळ संपली आहे... स्वर्ग तुमची वाट बघतोय...
बाई : फक्त २ मिनिट थांबा प्लिज...
यमदूत : २ मिनिटात तू करणार तरी काय गं बाई...!
बाई : व्हॉटस्‌ॲपवर स्टेटस्‌ ठेवते 'ट्रॅव्हलिंग टू स्वर्ग'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ चा विजेता कोण?

– पृथ्वीराज मोहोळ

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यातच 'आम्ही दोघे आमचे एक' अशी त्रिकोणी कुटुंबव्यवस्था काळानुसार बनत चालली आहे. मुलांना उच्च शिक्षण देता यावे. स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे, करिअरमध्ये उच्च स्थान मिळावे, यासाठी आजच्या आधुनिक काळातील आईला घराबाहेर पडणे अपरिहार्य झाले आहे. स्त्री-पुरुष समानतेची कितीही उदाहरणे आपण मासिक, वर्तमानपत्रे यांच्यामधून वाचली, तरी बालसंगोपनाची जबाबदारी कित्येक वेळा आईवरच लादली जाते व अशा वेळी तिला नोकरी करून मुलांचे संगोपन करण्यासाठी पाळणाघराची निवड करावी लागते.

अयोग्य पाळणाघर :

१. कमी जागेत जास्तीत जास्त मुले कोंबून ठेवणे. २. अस्वच्छ, कोंदट वातावरण असलेले.

३. पाळणाघरातील सदस्य उदा. तेथील काकू/मावशी, शिक्षिका, मदतनीस, कर्मचारी या स्वभाव रागीट, चिडखोर, तापट असणे.

४. पाळणाघरातील कर्मचाऱ्यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नसणे.

### पाळणाघर

५. पाळणाघराची संचालिका सुशिक्षित व स्वभावाने प्रेमळ नसेल तर.

६. काही लोक फावल्या वेळेत करावयाचा धंदा म्हणूनही पाळणाघर चालवतात.

७. पाळणाघरातील स्वयंपाकघर, खेळण्याची जागा, झोपण्याची जागा स्वच्छ नसेल व अपुरी असेल, तर मुलांना साथीचे आजार होण्याची शक्यता असते. म्हणून अशा प्रकारचे पाळणाघर निवडू नये.

**पाळणाघर निवडताना घ्यावयाची काळजी :**

सहसा पाळणाघर हे आपल्या स्वतःच्या घरापासून जवळ निवडावे. म्हणजे ऑफिसमधून येताना मुलांना घरी आणता येते.

✻ पाळणाघर चालविणारी संचालिका ही सुशिक्षित, सुसंस्कृत व स्वभावाने प्रेमळ आहे का, पाहावे.

✻ पाळणाघरातील स्वयंपाक बनविणारी बाई स्वच्छ आहे का, तेथील स्वयंपाकघर स्वच्छ आ का, हे पाहावे.

✻ पाळणाघराची जागा ही मोठी, हवेशीर, प्रशस्त, मुलांना खेळण्यास भरपर जागा, विविध खा. आहेत का, हे पाहावे.

✻ पाळणाघरात असणाऱ्या शिक्षिका, काकू, मावशी, ताई, मदतनीस यांना मुलांमध्ये त्याच्यावर मनापासून प्रेम करण्याची, त्यांच्या कलागुणांना वाव देण्याची उपजतच असावी. मुलांमध्ये रमण्याची उपजतच आवड पाळणाघरातील कर्मचाऱ्यांनी बालविकासाचे प्रशिक्षण घेतलेले आहे की नाही ते पाहावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ध्येय उच्च ठेवून कष्टाची तयारी ठेवा

## सुहास कुलकर्णी यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्या मंदिर माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – ध्येय नेहमी उच्च ठेवावे आणि ते साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण कष्ट करण्याची तयारी ठेवावी. प्रयत्नपूर्वक प्रयत्न केल्यासच भारत आत्मनिर्भर बनवण्याचे ध्येय पूर्ण होईल, असे प्रतिपादन गंधर्व इंजिनिअर प्रा. लि.चे संचालक सुहास दत्तात्रय कुलकर्णी यांनी केले.



सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ गंधर्व इंजिनिअर प्रा. लि.चे संचालक सुहास दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत व शालेय समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ गंधर्व इंजिनिअर प्रा. लि.चे संचालक सुहास दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत व शालेय समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव प्र. स. ओहोळ, सचिव सुरेश शिरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, चेअरमन विकास सोनटक्के, व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य ॲड. किशोर देशपांडे, सुनील जोशी, सौ. संध्या कुलकर्णी, श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे, सावेडी समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. ईशस्तवन व स्वागतगीतानंतर मुख्याध्यापक सुनील कानडे यांनी प्रास्ताविकात स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. विद्यार्थी, शाळा व शिक्षक या त्रिवेणी संगमातून तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेतून विद्यालयाची प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर त्यांनी शालेय अहवालाचे वाचन केले.

विद्यार्थी तेजस वाघ व श्रेया पिस्का यांनी अतिथी व अध्यक्षांच्या स्वागत प्रस्तावाला अनुमोदन दिले. यावेळी पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक गायकवाड, सौ. श्रुती कुलकर्णी व सौ. शारदा हौसिंग यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक टकले यांनी प्रमुख अतिथी व अध्यक्षांचा परिचय करून दिला.

अध्यक्षीय भाषणात स्वप्निल कुलकर्णी म्हणाले की, प्रत्येकाने स्वतःमधील चांगले गुण व अवगुण ओळखले पाहिजेत. आपली स्पर्धा जगाशी नसून ती स्वतःशीच असते. 'मीच माझा स्पर्धक आणि उद्याचा नवा ध्यास' असे ठरवून स्वतःमध्ये सतत सुधारणा घडवून आणाव्यात. विद्यार्थ्यांनी पालकांशी संवाद साधावा आणि पालकांनीही मुलांना वेळ द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचा अहवाल सचिव सुरेश शिरसागर यांनी सादर केला. इयत्ता दहावीतील विद्यार्थी सारंग जोशी व मनस्वी कोरडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ठेविदार व क्रीडा स्पर्धा यादीचे वाचन सौ. योगिता कुलकर्णी यांनी, तर सांस्कृतिक स्पर्धा यादीचे वाचन श्रीमती नागरगोजे यांनी केले. पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. आदर्श विद्यार्थी म्हणून सारंग जोशी, आदर्श विद्यार्थिनी म्हणून कु. चितळे स्नेहल व कु. सर्व साधारण कुलकर्णी, तर आदर्श उत्कृष्ट खेळाडू म्हणून कु. काव्यश्री शिरापुरी यांना पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शारदा हौसिंग यांनी, तर आभार प्रदर्शन श्रीमती श्रद्धा नागरगोजे यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाट्य व सांस्कृतिक सादरीकरणातून आपले कलागुण सादर केले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## काव्यातील बोधवचने - सद्‌विचारदर्शन

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

संस्कृत काव्यात शतककाव्ये लिहिणारा महाकवी म्हणून भर्तृहरीचे स्थान वेगळे आहे. संस्कृत काव्यात नीतिशतक, शृंगारशतक आणि वैराग्यशतक अशी तीन शतककाव्ये भर्तृहरीने लिहिली आहेत. या तीनही शतककाव्यांचे विषय, आशय आणि त्यातून दिलेले संदेश वेगळे आहेत. 'शृंगारशतक' वाचताना नीतिशतक लिहिणारा भर्तृहरी हाच का ? एकच कवी अशा विविधांगी रसवृती कशा निर्माण करू शकतो? असा प्रश्न उभा राहतो. नीतिशतकात त्याने लिहिलेल्या अनेक श्लोकातील काव्यपंक्ती ह्या सुभाषिते म्हणून उभ्या राहतात.

'वाग्भूषणं भूषण', 'विद्या गुरुणां गुरु', 'विद्या विहीनः पशु', 'शीलं परं भूषणम्' यासाररखी अनेक वचने आजही भाषणात, बोलण्यात, निरुपणात, लेखनात प्रमाण म्हणून दिली जातात तर काही मान्यवर संस्थांनी आपली बोधवाक्ये म्हणून ती स्वीकारली आहेत.

सातव्या शतकात होऊन गेलेला महाकवी भर्तृहरी आजही सुभाषितांतून, बोधवचनातून, बोधवाक्यातून आम्हाला दिसतो. दीड हजार वर्षे होऊनही त्याचे शब्द आणि लिहिलेली वचने अक्षय ठरली आहेत. एकीकडे संस्कृत काव्य उच्चतम भाषेने भारदस्त पांडित्य उभे करत होते त्याच काळात लोकांना समजणारे संस्कृतचे प्राकृत रूप मात्र भर्तृहरी मांडत होता.

मराठी भाषेत संतवाणी जितकी सहजपणे भावते तितक्याच सहजपणे तो देववाणीला स्वाभाविक रूपात उभा करत होता. जगद्गुरु तुकोबारायांच्या अभंगातील अनेक वचनांना सुभाषिताचे मोठेपण प्राप्त झाले आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती', 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले', 'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे', 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळ', 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे', 'साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा', 'तिर्थी धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनी' यासारखी अनेक वचने ही सुभाषिते होऊन सामान्यांच्या जिभेवर खेळत आहेत.

माणसाची नैतिक शक्ती आणि नैतिक बुद्धी जेव्हा जागी होते तेव्हाच प्रबोधनाचे साध्य गवसते. नवा संदेश उभा राहतो. तुकोबारायांनी आपल्या अभंगवाणीतून ठायी ठायी हा संदेश देऊन समाजाला जागते ठेवले आहे. त्यांच्या विचारात सखोलता आहे तर वाणीत रोखठोकपणा आहे. बोधवाक्यातील वचने केवळ कल्पनाविस्ताराने नटलेली नाहीत तर अनुभवाच्या उत्कटतेने व्यक्त झाली आहेत. म्हणूनच आपल्या कवितेला लोकमानसाच्या जवळ नेणारे तुकोबाराय आणि भर्तृहरी आपल्याला खूप जवळचे वाटतात. ही बोधवचने म्हणजेच सद्विचारदर्शन होय.

– किशोर गांधी, मो. ९८२२०२०६९१

# अहिल्यानगर सीए शाखेतर्फे ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

नगर – द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंट्स ऑफ इंडिया यांच्या करिअर इन अकाउटिंग ॲण्ड फायनान्स फॉर यूथ या समितीच्या वतीने संपूर्ण भारतभरात एकाच दिवशी ८ वी पासून पुढील विद्यार्थ्यांसाठी सीए अभ्यासक्रमाबद्दलची माहिती तसेच या क्षेत्रात तरुणांना असणारी संधी या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्र आयोजित केले होते. यावेळी अहिल्यानगर शाखेच्यावतीने अहमदनगर एज्युकेशन सोसायटी येथे इयत्ता ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली.





द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंट्स ऑफ इंडिया यांच्या करिअर इन अकाउटिंग ॲण्ड फायनान्स फॉर यूथ या समितीच्या वतीने संपूर्ण भारतभरात एकाच दिवशी ८ वी पासून पुढील विद्यार्थ्यांसाठी सीए अभ्यासक्रमाबद्दलची माहिती तसेच या क्षेत्रात तरुणांना असणारी संधी या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्र आयोजित केले होते.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी येथे सीए नगर शाखेतर्फे घेण्यात आलेल्या करीअर मार्गदर्शन चर्चासत्रात सीए प्रसाद पुराणिक बोलत होते. विद्यार्थ्यांनी करिअर निवड करताना स्वतःच्या आवडी, क्षमता व भविष्यातील संधी यांचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळण्यास मदत होईल, असे मत पालक व शिक्षकांनी व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे सल्लागार समिती सदस्य भूषण भंडारी, सीए शाखेचे उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, सचिव सीए महेश तिवारी, खजिनदार सीए महेश भळगट, समिति सदस्य सीए सुनंदा रच्चा, प्रमुख वक्ते सीए रोहित बोरा तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, उल्हास दुग्गड आणि अजय बारगळ उपस्थित होते.

कार्यक्रमात तज्ज्ञ मार्गदर्शक सीए रोहित बोरा यांनी विद्यार्थ्यांना दहावी नंतर व बारावी नंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत सविस्तर माहिती दिली. चार्टर्ड अकाउंटंट (CA) अभ्यासक्रमाची रचना, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासाची पद्धत तसेच भविष्यातील करिअर संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाणिज्य, विज्ञान व कला शाखांमधील विविध अभ्यासक्रमां विषयी विद्यार्थ्यांच्या शंका दूर करण्यात आल्या.

शाखेचे उपाध्यक्ष आणि विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी पूढच्या काळात देखील सीए अभ्यासक्रम बद्दल कुणालाही काही माहिती हवी असल्यास नगर शाखेमध्ये माहिती दिली जाईल, तसेच नगर शाखेतर्फे लवकरच आर्थिक साक्षरता अभियान, गुंतवणूकदारांसाठी इन्वेस्टर अवेअरनेस प्रोग्राम, असे विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत, असे संगितले. तसेच सर्व शाळा व कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. त्याबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, भूषण भंडारी व शाळेचे मुख्याध्यापक व वक्ते सीए रोहित बोरा यांचे सी ए शाखा नगर तर्फे आभार मानण्यात आले.

# नगर व आष्टी तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

## खा. नीलेश लंके यांच्या प्रयत्नाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून ७.७८ कोटींचा निधी

नगर – नगर तालुक्यातील मठपिंप्री (ता. नगर) येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ७.७८ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले. दोबोले वस्ती व कळमकर वस्तीला जोडणाऱ्या रस्त्यांची दीर्घकालीन मागणी होती. या मागणीला प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती बाळासाहेब हराळ यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याला प्रतिसाद देत नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी निधी मंजूर करून या कामास गती दिली.



नगर व आष्टी तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या भूमिपूजन प्रसंगी खा. नीलेश लंके, बाळासाहेब हराळ, संपत म्हस्के, दिलीपराव लाळगे व इतर.

भूमिपूजन प्रसंगी ज्येष्ठ नेते संपत म्हस्के, माजी जि. प. सदस्य बाळासाहेब हराळ, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीपराव लाळगे, पंचायत समितीचे माजी सदस्य बाळासाहेब दरंदले, संजय बोरकर, संतोष कळमकर, बाळासाहेब कळमकर, आकाश नवसुपे, रामदास बोरकर, सुनिल कळमकर, दिपक नवसुपे, हौसराव नवसुपे, लक्ष्मण दोबोले, सुभाष दोबोले, जनार्दन चौधरी, सागर नवसुपे, दिलीप नवसुपे यांच्यासह मठपिंप्री, हातवळण गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

मठपिंप्री गावांतर्गत सुमारे ९ किलोमीटर लांबीचा हा रस्ता मजबूत डांबरीकरणाने विकसित करण्यात येणार असून, अंतर्गत दळणवळण सुलभ होणार आहे. नगर तालुक्यातील इतरही अनेक ग्रामीण रस्त्यांना मंजुरी मिळाली असून, त्यांची भूमिपूजने लवकरच केली जातील, असे खा. लंके यांनी यावेळी स्पष्ट केले.

आष्टी व नगर तालुक्याला जोडणारा महत्त्वाचा रस्ता म्हणून या मार्गाकडे पाहिले जाते. कामाच्या दरम्यान या रस्त्यावर मोठ्या पुलाची गरज ग्रामस्थांनी मांडली. खा. लंके यांनी अधिकाऱ्यांसह ट्रायल पीट द्वारे सर्वेक्षण केले आहे. पुलाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून, हे कामही लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### 'बाळासाहेब हराळ शब्द पाळणारे नेतृत्व': खा.लंके

कार्यक्रमात बोलताना खा. निलेश लंके यांनी बाळासाहेब हराळ यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. जनतेशी जोडलेले नेतृत्व म्हणून हराळ यांनी समाजकारण केंद्रस्थानी ठेवत अनेक प्रश्न सोडवले आहेत. शब्द पाळणारा नेता अशी त्यांची प्रतिमा असून, त्यांचे राजकीय भविष्य उज्वल आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.



थंडीपासून दिलासा देणारा माणुसकीचा उबदार हात, आयुर्वेदामृत संघाकडून निराधारांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

# थंडीपासून दिलासा देणारा माणुसकीचा उबदार हात, आयुर्वेदामृत संघाकडून निराधारांना ब्लँकेटचे वाटप

नगर – वाढत्या थंडीमुळे रस्त्यावर, फूटपाथवर तसेच बस स्थानक व रेल्वे स्टेशन परिसरात झोपणाऱ्या गोरगरीब व निराधार नागरिकांचे हाल वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर आयुर्वेदामृत निसर्गोपचार सेवाभावी संघाच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत शहरातील माळीवाडा, बस स्थानक, रेल्वे स्टेशन व फूटपाथ परिसरात झोपणाऱ्या निराधारांना तब्बल १४२ ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी आयुर्वेदामृत निसर्गोपचार सेवाभावी संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष साळवे, खजिनदार संकेत खेतमाळीस, गोरक्ष काळे, अ.नगर बार असोसिएशनचे सचिव ॲड. संदीप बुरके, ॲड. सतीश गिते, आरती उफाडे, जितेंद्र गांधी, संदीप चौधरी, प्रशांत जाधव, सागर निपसे, निकुल टिपरे, आकाश दिवे, योगेश कदम, संकेत व्यवहारे, चेतन जाधव, सुशील घंगाळे आदी उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील खेळाडूंना स्पर्धेद्वारे प्रोत्साहन मिळणार

## पै. नाना डोंगरे यांचे प्रतिपादन; निमगाव वाघा येथे राजेंद्र शिंदे चषक स्पर्धेला प्रारंभ, फ्लड लाईटमध्ये रंगणार आठवडाभर क्रिकेटचा थरार

नगर – स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा क्षेत्रात आपली गुणवत्ता दाखविण्याची संधी मिळणार आहे. खेळामुळे युवकांमध्ये संघभावना, शिस्त व निरोगी जीवनशैली विकसित होते. अशा स्पर्धा सातत्याने आयोजित होणे गरजेचे असून, ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार असल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले.



निमगाव वाघा (ता. नगर) येथे राजेंद्र शिंदे प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित राजेंद्र शिंदे चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन पार पडले.

नगर तालुक्यातील निमगाव वाघा (ता. नगर) येथे राजेंद्र शिंदे प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित राजेंद्र शिंदे चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. ही स्पर्धा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आली असून, प्लास्टिक बॉलवर आणि फ्लड लाईटच्या उजेडात आठवडाभर क्रिकेटचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेत पंचक्रोशीतील संघांचा सहभाग लाभला आहे. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, सागर कापसे, अनिल डोंगरे, किरण जाधव, अतुल फलके, दादा गायकवाड, मोहसिन शेख, वैभव पवार, संग्राम केदार, ऋषी जाधव, सुरज उधार, अन्सार नसीर शेख, भरत फलके, कचरु कापसे, प्रकाश गायकवाड, रेहान शेख, सुधीर शिंदे, अभि पाचारणे, भरत बोडखे आदी उपस्थित होते. तसेच उद्योजक गणेश जाधव, दिपक काळे, अर्जुन काळे, मयूर काळे यांच्यासह परिसरातील युवक उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या संघाला प्रथम पारितोषिक ४१ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक ३१ हजार रुपये, तृतीय पारितोषिक २१ हजार रुपये व चतुर्थ पारितोषिक ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच मॅन ऑफ द टुर्नामेंट, सलग तीन षटकार, सलग तीन चौकार यांसह विविध वैयक्तिक कामगिरीसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

# बालवयात संपूर्ण शुक्ल यजुर्वेद कंठस्थ

## तीन वेदकुमारांचा विक्रम; श्रीगुरुजी वेद विद्या प्रतिष्ठानतर्फे नाशिक पुण्यभूमीत 'वेदब्रह्मघोष'

नगर – तो क्षण होता अलौकिक, तो क्षण होता दैवी! जेव्हा पवित्र ओझर नगरीचा आसमंत केवळ वेदघोषानेच नव्हे, तर एका अभूतपूर्व मानवी साधनेच्या तेजाने उजळून निघाला. निमित्त होते महापंडित धनंजयभट्ट जोशी गुरुजी (घनपाठी) यांच्या श्रीगुरुजी वेद विद्या प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'शुक्ल यजुर्वेद मूळसंहिता एकाकी कंठस्थ पाठपारायण विधान' सोहळ्याचे! या ज्ञानयज्ञात तीन बाल तपस्वींनी संपूर्ण शुक्ल यजुर्वेद संहिता कंठस्थ म्हणून एक असाधारण विक्रम दक्षिण काशी म्हणजेच नाशिकमधून आपल्या नावे केला.



बालवयात संपूर्ण शुक्ल यजुर्वेद कंठस्थ करण्याचा विक्रम करणारे वेदकुमार.

नुकत्याच काशीच्या पुण्यभूमीत संपन्न झालेल्या 'दंड क्रम विधाना'च्या धर्तीवर आयोजित या सोहळ्याने संपूर्ण भारताचे लक्ष वेधून घेतले. या पारायण सोहळ्यात देशभरातून शेकडो वैदिक विद्यार्थी सहभागी झाले होते. यात वेदांत अभिजीत निसाळ, नगर, सोहम चोपडे, आणि शिव पाण्ड्या! या वेदकुमारांनी आपल्या अद्भुत स्मरणशक्ती, अविचल श्रद्धा आणि कठोर साधनेच्या बळावर संपूर्ण शुक्ल यजुर्वेद संहिता, एकही चूक न करता, मुखोद्गत सादर केली. त्यांचा स्वरबद्ध, लयबद्ध, शुद्ध आणि तेजस्वी वेदपाठ ऐकताना उपस्थित जनसमुदाय अक्षरशः भारावून गेला होता.

### वेद अध्ययन करणारा विद्यार्थी असामान्या

या ऐतिहासिक सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून शुक्ल यजुर्वेद अभ्यासक श्रीमहंत डॉ. अनिकेतशास्त्री महाराज यांची उपस्थित लाभली. 'वेदः शिवः शिवो वेदः। वेदाध्यायी सदा शिवः ।।' या श्लोकाचा अर्थ उलगडताना त्यांनी 'जो वेदांचे अध्ययन करतो तो विद्यार्थी सामान्य नसतो, तो साक्षात शिवस्वरूप असतो अन सांगितले. यावेळी धर्मशास्त्र अभ्यासक, वैदिक परंपरेचे उपासक आणि नागरिक उपस्थित होते.

# ‘हार-जीत’ साठी न खेळता खेळाडूंनी व्यक्तिमत्व विकास घडवण्यासाठी खेळावे

### डॉ. दिलीप टिपरसे यांचे आवाहन

नगर - निवृत्त शिक्षकांनी एकत्र येत चालवलेली ही संस्था आणि या संस्थेचे माजी विद्यार्थी संघ यांनी चांगल्या पद्धतीने नियोजन केले शाळेत शिक्षण घेऊन एकदा बाहेर पडलेले विद्यार्थी सहसा शाळेला परत जोडले जात नाहीत परंतु या शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थी संघाचे स्थापना करून शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त खो-खो स्पर्धेचे आयोजन केले. हे आयोजन खरोखरच खूप कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले.

बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमान बिशंबरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालय व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मुले व मुली खो-खो स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन डॉ. दिलीप टिपरसे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब नय्यर, तोफखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, मातोश्री फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक कावळे, संस्थेचे खजिनदार भास्करराव गोरे, अल्केमीज केमिस्ट्री अॅकॅडमीचे संचालक तुषार अंबाडे, महाराष्ट्र राज्य किशोरी मुली उपविजेता संघ मार्गदर्शक शंतनू पांडव व विनायक भुतकर, संस्थेचे संचालक दामोदर सातपुते, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रदीप काळे, उपाध्यक्ष शिवाजी कावडे, उपाध्यक्ष विठ्ठल सत्रे, खजिनदार अक्षय तोडमल, कार्याध्यक्ष संदीप यादव, सहकार्याध्यक्ष अशोक साळवे, क्रीडा शिक्षक नागरगोजे उपस्थित होते.



बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमान बिशंबरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालय व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मुले व मुली खो-खो स्पर्धा २०२५ स्पर्धेचे उद्घाटन डॉ. दिलीप टिपरसे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. टीपरसे म्हणाले की, खो-खो कबड्डी हे प्राचीन काळापासून आलेले खेळ आहेत. खो-खोच्या इतिहासात या वर्षी प्रथमच मोठी घटना घडली. जागतिक पातळीवर पहिली खो-खो स्पर्धा भरवण्यात आली आणि या स्पर्धेचे महिला व पुरुष वर्ल्डकप विजेते भारत ठरले. मोबाईलच्या युगात मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून मैदानी खेळाकडे वळवले पाहिजे. यासाठी विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. खेळामध्ये हार-जीत ही ठरलेलीच असते. पण खेळ खेळत असताना खेळाडूंनी हार-जीत यासाठी न खेळता व्यक्तिमत्व विकासासाठी खेळ खेळला पाहिजे. अशा स्पर्धेतूनच आंतरराष्ट्रीय खेळाडू घडत असतात, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार यांनी केले. माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष शिवाजी कावडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी पोलीस मित्र परिवाराचा सहकार्य लाभले. यावेळी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी संघाचे कैलास गर्जे, किशोर बरबडे, सुदाम गीते, अमृत वनवे, गणेश केकान, सैफ शेख, राम कुलकर्णी, राम अनभुले, सौरभ बिडवे, साई मेणे, वैभव नाईकवाडी, अजय जाधव, निखिल त्रंबके, गीतांजली कासार, कल्पना अवसरे, प्रशांत वाकचौरे, पवन नजन, वैष्णवी भोसले, साई साळुंखे, राजेंद्र तागड, सोनाली गारोळे, आकांक्षा बोरुडे, भारती थोरात, रोहित तापकीर, योगिनी सकट, राधा सरोदे, यश रोकडे, शीतल काकडे, सचिता साळवे आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे १२ डिसेंबर रोजी Pharma Fusion Freshers Party २०२५ या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर व जेष्ठ औषधनिर्माते, शेवगाव तालुका पांडुरंग लबडे आदी.

# प्रवरा मेडिकल कॉलेजमध्ये ‘फार्मा फ्युजन फ्रेशर्स पार्टी’

नगर - प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे १२ डिसेंबर रोजी फार्मा फ्युजन फ्रेशर्स पार्टी (Pharma Fusion Freshers Party) २०२५ या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर व ज्येष्ठ औषधनिर्माते, शेवगाव तालुका पांडुरंग लबडे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कॉलेजचे प्राचार्य महेश भालसिंग यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडत प्रास्ताविक व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यानंतर द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी सुती कांबळे हिने आपले मनोगत व अनुभव व्यक्त केले.

यानंतर प्रमुख अतिथी पांडुरंग लबडे यांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनातील अनुभव, शैक्षणिक घडण, तसेच फार्मसी क्षेत्रातील करिअर संधी, भविष्यात अनुसरावयाचे मार्गदर्शन आणि घ्यावयाची काळजी याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विविध फन गेम्स व मनोरंजनात्मक ॲक्टिव्हिटीज घेण्यात आल्या. यामध्ये प्रथम वर्षातून मिस्टर फ्रेशर कु. मणियार फैसल आणि मिस फ्रेशर कु. आकांक्षा नागरगोजे यांनी विजेतेपद पटकाविले.

सूत्रसंचालन प्रा. गणेश कर्डिले, कु. प्रिया आरोळे, कु. आकांक्षा शेळके, कु. खुशी पवार, कु. वैष्णवी आहुजा यांनी केले. प्रा. सोमनाथ रासने यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी द्वितीय वर्ष डी. फार्मसीचे विद्यार्थी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या प्री प्रायमरीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनात ‘प्रबोधन, देशभक्ती, नृत्य आणि नाट्याची रेलचेल’

### जिल्हाधिकाऱ्यांना भावले सादरीकरण

नगर - सावेडी येथील गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या प्री प्रायमरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलातील सादरीकरण, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह उपस्थित पालकांना भावले. दोन ते पाच वर्षाच्या चिमुकल्यांनी, भारतीय संस्कृती, प्रबोधनात्मक व देशभक्तीपर नृत्य आणि छोट्या नाटुकल्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. स्नेहसंमेलनात रामेलेल्या जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व सौ.मोना आशिया यांनी पालक व प्रमुख पाहुणे म्हणून पूर्णवेळ थांबून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. चिमुकल्यांनी केलेली पारंपरिक वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधत होती.



गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या प्री प्रायमरी व प्रायमरी विभागाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया. समवेत डॉ.रवींद्र साताळकर, प्रमुख पाहुणे सौ.मोना आशिया, महेंद्र गंधे, डॉ.सूचित तांबोळी, संस्थाच्या कार्यकारी विश्वस्त उषा देशमुख, सचिव सम्राट देशमुख, प्रिन्सिपॉल देविका देशमुख आदी.

गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या प्री प्रायमरीच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दीपप्रज्वलनाने केले. यावेळी दीपक देशमुख मेडिकल अॅण्ड एज्युकेशनल फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर, प्रमुख पाहुणे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे, डॉ.सुचित तांबोळी, गॅलॅक्सिच्या संस्थापिका उषा देशमुख, सचिव सम्राट देशमुख, डायरेक्टर देविका देशमुख आदींसह पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

यावेळी शाळेतील छोट्या विद्यार्थ्यांनी प्रबोधनात्मक विषयावर सादरीकरणातून मोठ्यांचा व वृद्धांचा आदर, भांगडा, शेतकरी नृत्य व कंटेम्परारी बॉलीवूड स्टाईल नृत्य प्रकारांनी कार्यक्रमात उत्साह आणला. तसेच नाटकातून अग्निशामक दलाच्या कार्याची माहिती दिली. ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी कृष्ण जन्माचा देखावा व राधा कृष्ण नृत्य सादर करून पालकांची मने जिंकली. तसेच लांडगा आला रे आला.. ही गोष्ट सुंदर अभिनयाने सादर केली. यावेळी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या आईनेही आपल्या मुलाबरोबर एक खास नृत्य सादर केलं आणि सर्व शिक्षकांनी पालकत्वावर एक नाटक सादर केले हे दोन्ही कार्यक्रमया स्नेहसंमेलांचे वैशिष्ठ्य ठरले.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया म्हणाले, विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा, संस्कृती जोपासत काळाबरोबर चालत आधुनिक पद्धतीने शिक्षण देणे सध्याच्या काळात आवश्यक आहे. ही परंपरा गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या मध्यापातून योग्य प्रकारे जोपसली जात असल्याने ही शाळा उत्तम आहे. स्नेहसंमेलनात लहान विद्यार्थ्यांनी खूप उत्कृष्ट व हृदयस्पर्शी सादरीकरण करत सर्वाची मने जिंकली आहेत.

सौ. मोना आशिया म्हणाल्या, गॅलेक्सी नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा योग्य पद्धतीने बौद्धिक विकास होत आहे. शाळेतील विविध उपक्रमांमुळे मुलांचा कलागुणांना चालना मिळत आहे. सर्व शिक्षक उत्कृष्ट मार्गदर्शन करून छोट्या विद्यार्थ्यांना घडवत आहेत, असे सांगून संस्थेचे आभार मानले.

यावेळी डॉ.सुचित तांबोळी यांनी लहान मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी काही टिप्स देत पालकांना मार्गदर्शन केले. महेंद्र गंधे व अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर संस्थापिका उषा देशमुख यांनी उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात देविका देशमुख यांनी स्कूलच्या विविध उपक्रमाची माहिती देऊन प्रगतीचा वार्षिक अहवाल सादर केला.





नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर (जुने नाव - कन्या विद्या मंदिर) या विद्यालयाचा दोन दिवस चाललेला माजी विद्यार्थिनींचा माहेरमेळावा पार पडला.

# कन्या विद्या मंदिर प्रशालेच्या माजी विद्यार्थिनींचा माहेर मेळावा जल्लोषात

नगर - अहिल्यानगर येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर (जुने नाव - कन्या विद्या मंदिर) या विद्यालयाचा दोन दिवस चाललेला माजी विद्यार्थिनींचा माहेरमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. माजी विद्यार्थिनी संघ आणि नव विद्या प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्यात १९६५ पासून ते २०२२ पर्यंतच्या साडेसातशेहून अधिक माजी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

मेळाव्याचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, मानद सचिव निलेश वैकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका मंदा शिंदे आणि संस्थेचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या प्रसंगी उपस्थितांनी कन्या विद्या मंदिरच्या सुवर्ण परंपरेचा गौरव केला. तसेच माजी विद्यार्थिनींच्या जीवनप्रवासातील यशोगाथांचा उल्लेख करून विद्यालयाच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा दिला.

मेळाव्याचे विशेष आकर्षण ठरला तो म्हणजे हृदयस्पर्शी गुरुपूजन सोहळा. शाळेतील आजी-माजी शिक्षकांचे विद्यार्थिनींनी पारंपरिक पद्धतीने पूजन करून त्यांच्या ऋणाची आठवण कृतज्ञतेने व्यक्त केली. या प्रसंगी वातावरण शिक्षक-विद्यार्थिनींच्या भावनांनी भारावून गेले.

या दोन दिवसांच्या मेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रम, संवाद सत्र, बालपणीच्या आठवणींची उजळणी, तसेच शाळेच्या प्रगतीविषयीच्या योजना यांचा समावेश होता.

मेळावा यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थिनी संघाच्या रेश्मा आठरे, अर्चना पलूसकर, अपर्णा क्षीरसागर, स्नेहा जोशी, रोहिणी वाघमारे, प्रिया बापट, दर्शना गांधी, सारिका कटारिया, मीनाक्षी पाठक, अमृता पाथरकर, प्रज्ञा जोशी आदींनी परिश्रम घेतले.

अनेकांनी आपले बालपण पुन्हा अनुभवत कन्या विद्या मंदिर म्हणजे आमचे माहेरच असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचा समारोप निवेदक चेतन गायकवाड यांच्या विनोदी सादरीकरणाने उत्साहात झाला.

# संस्कार ॲकॅडमीत ‘ग्रॅण्ड ॲन्युअल स्पोर्ट डे’ उत्साहात

नगर - तालुका व जिल्हा अहिल्यानगर येथील संस्कार अॅकॅडमीच्या वतीने नुकतेच ॲन्युअल स्पोर्ट डे चे आयोजन करण्यात आले. यंदाच्या स्पोर्ट डेची संकल्पना ग्रँड ॲन्युअल स्पोर्ट डे विथ ग्रॅण्ड पेरेंटस् अशी ठेवण्यात आली होती.

या निमित्ताने अकॅडमीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांना त्यांच्या नातवंडांसोबत खेळातील सहखेळाडू बनवून विविध गमतीशीर व मनोरंजक खेळ घेण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांसह आजी-आजोबांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



संस्कार ॲकॅडमीत ‘ग्रॅण्ड ॲन्युअल स्पोर्ट डे’ साजरा करण्यात आला.

खेळांच्या माध्यमातून केवळ मनोरंजनच नव्हे, तर मोबाईलच्या आहारी गेलेल्या आजच्या तरुणाईला मोबाईल सोडा व मैदानाकडे चला असा सकारात्मक संदेश आरणगाव येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अॅकॅडमीच्या संचालिका प्राध्यापिका सौ. अमृता अमोल देवकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. आजच्या धावपळीच्या व मोबाईलप्रधान युगात आजी-आजोबांचे स्थान आणि त्यांचे कुटुंबातील महत्त्व याविषयी त्यांनी आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि मूल्य अंगीकारावे

### पोलीस उपाधीक्षक गिरीश वमने यांचे प्रतिपादन, अशोकभाऊ फिरोदिया शाळेच्या स्नेहसंमेलनातून उलगडला नात्यातील गोडवा; नृत्य, नाट्य व भावनिक सादरीकरणातून नात्यांचा सुंदर प्रवास

नगर - सोशल मीडियाच्या काळात नवीन-नवीन येणाऱ्या विविध ॲप्सचा वापर विद्यार्थ्यांनी जपून व समजून करावा. चिमुकल्या विद्यार्थ्यांचे खरे आधारस्तंभ म्हणजे त्यांचे आई-वडील असून, विद्यार्थ्यांनी नेहमीच त्यांचा आदर करावा. तसेच शिक्षक हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक असल्याने त्यांचाही आदर राखणे तितकेच आवश्यक आहे. जीवनात छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांना आदर्श मानून कार्य करत असल्याचे नमूद करत पोलीस उपाधीक्षक गिरीश वमने यांनी विद्यार्थ्यांनाही त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा अंगीकार करण्याचा संदेश दिला. यावेळी त्यांनी स्वतःसमोर असणाऱ्या आव्हानांबाबत बोलताना सांगितले की, पोलीस सेवेतील कर्तव्याला कोणताही ठराविक वेळ नसतो. पोलीस अधिकारी हे चोवीस तास कर्तव्यावर असतात. समाजाच्या सुरक्षिततेसाठी रात्रंदिवस सेवा देताना येणाऱ्या जबाबदाऱ्या व त्याग याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. कमी वयात विद्यार्थ्यांवर अधिक जबाबदारी टाकू नका, असा सल्ला पालकांना देऊन, व्यवहार ज्ञान, सायबर क्राईम व डिजीटल अरेस्ट बद्दल सावधानता बाळगण्याची माहिती दिली.






अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पोलीस उपाधीक्षक गिरीश वमने यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. समवेत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, गौरव फिरोदिया आदी.

अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन नात्यातील गोडवा या संकल्पनेवर उत्साहात पार पडले. आयुष्यात नात्यांचे महत्त्व आणि ज्येष्ठांचा आदर, सन्मान आपल्या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रभावीपणे उलगडून दाखवले. मैत्रीचे नाते, बहिण-भावाचे अतूट बंध, आई-वडिलांचे प्रेम तसेच आजी-आजोबांचे मोल विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य व भावनिक सादरीकरणातून मांडले. या कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षक व पालकांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पोलीस उपाधीक्षक गिरीश वमने यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. मोने कला मंदिरात झालेल्या या कार्यक्रमास संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, गौरव फिरोदिया, विश्वस्त ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाच्या सदस्या पुष्पा फिरोदिया, सुनीता मुथा, मीना बोरा, माजी मुख्याध्यापिका किशोरी सायमन, विद्यालयाचे प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्य कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, पूर्व-प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक, विद्यार्थी प्रतिनिधी वरद लोखंडे व विद्यार्थिनी प्रतिनिधी श्रावणी देशमुख यांच्यासह सर्व अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर करून पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, शालेय जीवन जीवनातील सोनेरी क्षण असून, विद्यार्थी दशेतच जीवनाचा खरा पाया रोवला जातो. आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आपल्यासाठी नक्कीच उपयुक्त आहे; मात्र त्याचा वापर आपल्या जीवनात सकारात्मक आणि योग्य दिशेने होणे अत्यंत आवश्यक आहे. आयुष्याच्या योग्य टप्प्यावर योग्य निर्णय घेतले, तर आपले जीवन अधिक यशस्वी, समृद्ध आणि सुंदर घडू शकते. त्यामुळे आयुष्यामध्ये निर्णयक्षमता ही अतिशय महत्त्वाची असून, योग्य निर्णयच आपल्या यशाचा पाया ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी पोलीस उपाधीक्षक गिरीश वमने यांची ओळख मुलाखतीद्वारे करून देण्यात आली. त्यांच्या बालपणाविषयी, शिक्षणप्रवासाविषयी व त्यांनी निवडलेल्या क्षेत्राविषयी विचारलेल्या प्रश्नांमधून अक्षरा गांधी व आराध्या तिपुले या विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्यांना प्रभावीपणे बोलते केले.

पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाची यादी वाचन केदारी आनंदी व पोटे ध्रुवी या विद्यार्थिनींनी केले. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन नमन समृद्धी व शहा साची यांनी केले. वरद लोखंडे व श्रावणी देशमुख या विद्यार्थ्यांनी आभार मानले. नात्यातील गोडवा या अंतर्गत विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे सूत्रसंचालन वेदिका गुजर व संचित बारसे या विद्यार्थ्यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद लाभला. नात्यातील गोडवा या संकल्पनेवर स्नेहसंमेलन उत्साहात पार पाडला. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली.

### रोप मल्लखांबच्या चित्तथरारक कवायतींनी वेधले लक्ष

स्नेहसंमेलनात रौप मल्लखांबावर चित्तथरारक कवायती रंगल्या होत्या. मुला-मुलींनी रोप मल्लखांबावर चित्तथरारक खेळाचे प्रदर्शन घडवून उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेतून शारीरिक लवचिकता व चपळपणाचा उत्कृष्ट खेळ पहावयास मिळाला. तर रोप मल्लखांबावर खेळाडूंनी विविध धाडसी प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या हृद्याचा ठोका चुकवला.



# गरमागरम रोटी नूडल्स

पोळ्या उरल्यावर चांगलीच पंचाइत होते. पण आता या पोळ्यांपासून तुम्ही चविष्ट नूडल्स बनवू शकता. रोटी नूडल्सची ही रेसिपी जाणून घेऊ.

**साहित्य :** पोळ्या, जीरं, एक कांदा, दोन टोमॅटो, एक गाजर, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा सोया सॉस, लाल तिखट आणि धडेपूड प्रत्येकी एक चमचा, अर्धा चमचा हळद, गरम मसाला, मीठ, तेल आणि कोथिंबिर,

**कृती :** सर्व भाज्या चिरून घ्या. आता कढईत तेल गरम करा. त्यात जीरं घाला. थोडं परतून घ्या. पोळ्यांचे लांब तुकडे करून घ्या. तेलात कांदा घालून परता. मग हिरवी मिरची घाला. मग गाजर आणि टोमॅटो घालून थोडं शिजवून घ्या. भाज्या शिजल्यावर त्यात सर्व मसाले आणि मीठ घाला. दोन मिनिटं परता. मग सोया सॉस घाला. शेवटी पोळ्यांचे तुकडे घालून मिक्स करा. त्यावर कोथिंबिर घाला आणि गरमागरम रोटी नूडल्स खा.

इटपट रेसिपी




## शेर की जुबानी

तारों में अकेले चांद जगमगाता है, मुश्कील में अकेला इंसान डगमगाता है,कांटो से मत घबराना मेरे दोस्त,क्योंकी कांटों में भी गुलाब मुस्कुराता है।

प्यारी सी सुबह बोली उठ के देख क्या नजारा है,मैंने कहा रुक पहले मेसेज तो भेजने दे उसे, जो इस सुबह से भी प्यारा है।

जिसे दिल की कलम और मोहब्बत की इंक कहते हैं,जिसे लम्हों की किताब और यादों का कव्हर कहते हैं, यही वो सबजेक्ट है जिसे, फ्रेंडशीप कहते है.।

# अखेर यशाला गवसणी!

अचिव्हर

जीवन नेहमीच एक संघर्ष असते, प्रत्येक दिवस एक आव्हान घेऊन येतो. प्रत्येक पावलावर अडथळे असतात आणि प्रत्येक दिवस एक परीक्षा असते. असेच अनेक अडथळे पार करून यशशिखरावर विराजमान होणारेही असतात. पलामू जिल्ह्यातील रहिवासी गौतम गौरव यांअसेच यश मिळवले आहे. गौतम गौरवला ४० हून अधिक स्पर्धा परीक्षांमध्ये अपयश आले, परंतु या अपयशांनंतरही त्यांनी हार मानली नाही आणि अखेर २०२३ च्या जेपीएससी नागरी सेवा परीक्षेत चौथे स्थान मि ळवले. या काळात त्यांनी सात वेळा सरकारी नोकऱ्याही यशस्वीरित्या मिळवल्या.

गौतमचे बालपण आर्थिक आव्हानांनी भरलेले होते. त्यांच्या वडिलांचे कपड्यांचे दुकान होते. दहावीत असताना त्यांनी महागड्या आयआयटी शिकवणी फी परवडण्यासाठी एका कोचिंग संस्थेत परीक्षा दिली आणि शंभर टक्के शिष्यवृत्ती मिळवली. बालपणात त्यांच्या आईचे सर्व दागिने चोरीला गेले. कमवायला लागल्यावर पुन्हा आईसाठी दागिने बनवण्याचे त्याचे स्वप्न होते. सर्व हाल अपेष्टा आणि आर्थिक ओढाताण सहन करून त्याच्या शिक्षणाशी कधीही तडजोड न केल्याबद्दल तो त्याच्या पालकांचा आभारी आहे.

अभियांत्रिकी पूर्ण केल्यानंतर, गौतमने कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोकरी मिळवली. परंतु ही नोकरी त्याच्या स्वप्नात अडथळा आणत आहे, असे त्याला जाणवले. त्याने एक कठीण निर्णय घेतला आणि नोकरी सोडली. त्यानंतर त्याने तयारीवर लक्ष केंद्रित केले. हा प्रवास सोपा नव्हता. त्याने ३५ पेक्षा जास्त परीक्षा दिल्या. त्यात तो अनुत्तीर्ण झाला. कधीकधी तो एक किंवा काही दशांश गुणांमुळे मागे राहिला. त्याला खूप त्रास झाला, पण त्याने हार मानली नाही आणि प्रयत्न करत राहण्याचे स्वतःला वचन दिले.




**यश आणि पुढचा रस्ता**

चांगली तयारी केली की यश स्वाभाविकपणे मिळते, यावर त्याचा विश्वास होता. त्याने 'हिंदुस्तान पेट्रोलियम',' एसएससी सीजीएल' आणि इंडियन बँकेसह सात सरकारी नोकऱ्या यशस्वीरित्या मिळवल्या. त्याची एसएससी सीजीएल परीक्षेसाठी निवड झाली. त्याला भारतीय हवामान विभागातही नोकरी मिळाली. दरम्यान त्याची इंडियन बँकेत औद्योगिक विकास अधिकारी म्हणून निवड झाली, परंतु त्याने 'आयएम डी'मध्ये सामील होण्यास नकार दिला. गौतमने झारखंड सरकारची मोटार वाहन निरीक्षक परीक्षादेखील दिली होती. तिथेही त्याची निवड झाली. तो सध्या लोहरदगा येथे सेवा बजावत आहे. परंतु येत्या काही दिवसांत तो 'जेपीएससी' अधिकारी होण्यासाठी लागणारे प्रशिक्षण घेण्यासाठी ही नोकरी सोडेल.

**आईबाबत भावनिक**

त्याच्या पहिल्या पगाराबद्दल बोलताना गौतम भावनिक झाला. त्याने प्रथम त्याच्या आईसाठी साडी खरेदी केली, घरी पूजेसाठी पैसे पाठवले आणि स्वतःसाठी एक ट्रॉली खरेदी केली, जी आजही त्याच्यासाठी खूप खास आहे. गौतम आता एक चांगला प्रशासक बनून समाजाला परतफेड करू इच्छितो. आव्हानांना तोंड देणे हा जीवनाचा एक भाग आहे असे तो मानतो. तो तरुणांना संदेश देतो, की सरकारी नोकरी ही सर्वस्व नाही, तर फक्त एक साधन आहे. आपला देश वेगाने प्रगती करत आहे आणि अनेक संधी समोर येत आहेत; आपल्याला फक्त आपले कान आणि डोळे उघडे ठेवण्याची गरज आहे.

## ॲप वर्ल्ड




### व्हॉट्सॲपसाठी नवी नियमावली

आता केंद्र सरकारने व्हॉट्सॲपच्या वापराबाबत नवे निर्देश जारी केले आहेत. त्यानुसार व्हॉट्सॲप वापरायचे असेल तर सीम मोबाईलमध्ये ॲक्टीव्ह असणे गरजेचं आहे. व्हॉट्सॲपच नाही तर टेलिग्राम आणि सिग्नल सारख्या ओटीपी आधारित ॲप्सलादेखील अशाप्रकारचे नियम लागू करण्यात आले आहेत.

केंद्र सरकारने व्हॉट्सॲपसह टेलिग्राम आणि सिग्नल सारख्या मेसेजिंग ॲप कंपन्यांना नोटीस दिली आहे. या नोटीसमध्ये त्यांनी सीम बाईंडिंगबाबत नवे निर्दे श जारी केले आहेत. सध्याच्या व्यवस्थेनुसार एखाद्या नंबरवरून तुम्ही व्हॉट्सॲप सुरू केल्यानंतर ते सीम बंद झाले तरी तुमचे व्हॉट्सॲप सुरू राहते. अशा परिस्थितीत केवळ एकदा मोबाईल व्हेरिफिकेशन होते. आता मात्र, ही व्यवस्था बदलली जाणार आहे. सीम बाइंडिंग करून व्हॉट्सॲप चालवणाऱ्यांना आळा बसावा, अशी व्यवस्था करावी, असे निर्देश केंद्र सरकारकडून या कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे तुम्ही व्हाट्सॲप सुरू केले आणि नंतर मोबाईलम धून सीम काढले, तर तुमचे व्हॉट्सॲपदेखील बंद होणार आहे. हाच नियम टेलिग्राम, सिग्नल, आणि स्नॅपचॅटसारख्या ॲप्सलादेखील लागू असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे व्हॉट्सॲप वेबसाठीदेखील हा नियम लागू करण्यात आला आहे. त्यानुसार तुम्ही टेलिग्राम आणि व्हॉट्सॲप वेब ब्राउजरवर वापरत असाल तर तेही आता दर सहा तासांनी लॉगिन करावे लागणार आहे.

## टेक्नो टॉक



### ...म्हणून फोन करा 'रिस्टार्ट'

सतत मोबाईल वापरणाऱ्या अनेकांना फोनच्या रिस्टार्ट बटणाचा फायदा काय आहे हे माहित नसते. फोन रिस्टार्ट करण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे फोनची कामगिरीतर सुधारतेच, पण इतरही अनेक फंक्शन्स व्यवस्थित काम करतात. फोन रिस्टार्ट केल्याने रॅममधील अनावश्यक साचलेल्या अनेक फाईल्सचा कचरा निघून जातो. ॲप बंद असले तरी ते बॅकग्राऊंडमध्ये सुरूच असतात. त्यामुळे फोनची रॅम सतत भरत असते. त्यामुळे फोनची गती मंदावते. फोन रीस्टार्ट झाल्यावर रॅममध्ये बॅकग्राऊंडला सुरू असलेल्या गोष्टी बंद होतात. फोनचा स्पीड आणि परफॉर्मन्स सुधारतो. वाय-फाय, ब्लूटूथ अथवा सेल्यूलर डेटा कनेक्टिव्हिटीची अडचण येत असेल तर लगेच फोन रिस्टार्ट करा. ही अडचण दूर होईल.

**मोबाईल फोन हँग होण्याची अडचण दूर**

फोन सतत हँग होत असेल तर फोन रिस्टार्ट करणे फायद्याचे ठरते. यामुळे फोनच्या अंतर्गत असलेल्या फाईल्स गायब होतात आणि फोनवरील ताण, भार कमी होतो. फोन सतत हँग होत असेल, तर एक दोनदा रिबूट करून पाहा. ही अडचण सुटू शकते. एकंदरीत पाहाता फोन रीस्टार्ट केल्यास मेमरी रिफ्रेश होते. ॲपमधील गडबड दूर होतात, तर फोनच्या सिस्टीममधील काही समस्याही दूर होतात.

## फिटनेस फंडा




### वजन कमी करायचंय?

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी नेमकं काय करायचं, असा प्रश्न वजन कमी करणाऱ्या प्रत्येकालाच पडलेला असतो. विविध प्रकारची डाएट्स, व्यायाम प्रकार, वजन कमी करणाऱ्या पावडर्स यापैकी नेमकं काय निवडायचं याबाबत गोंधळ उडलेला असतो. पण काही उपायांमुळे तुमचं वजन कमी होऊ शकतं. हे उपाय प्रभावी असल्याचं वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालं आहे. अगदी सहज सोपे हे उपाय तुम्हीही करून बघू शकता.

* वजन कमी करण्यासाठी शरीरातला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. यासाठी पुरेसं पाणी प्यायला हवं. पाणी प्यायल्यानंतर पुढच्या एक ते सव्वा तासात चयापचच क्रियेचा वेग २४ ते ३० टक्क्यांनी वाढतो. यामुळे अधिक कॅलरी खर्च होतात. जेवणाच्या अर्धा तास आधी अर्धा लीटर पाणी प्यायल्यामुळे तुलनेने कमी अन्न खाल्लं जातं, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. अशा पद्धतीने पाणी पिणाऱ्यांचं वजन पाणी न पिणाऱ्यांच्या तुलनेत झपाट्याने कमी झाल्याचं दिसून आलं.

* व्यायामाआधी ब्लॅक कॉफी पिणं चांगलं असतं असं म्हटलं जातं. कॅफेनमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढत असल्याचं सप्रमाण सिद्ध झालं आहे.



# बहिणीशी बोललेलं आवडत नाही

मॅच मेकिंग

गेल्या चार वर्षांपासून माझं एका मुलीवर प्रेम आहे. या मुलीला धाकटी बहीण आहे. मला वाटतं माझ्या प्रेयसीला तिच्याच धाकट्या बहिणीची असूया वाटते. मी तिच्या बहिणीशी बोललेलं तिला आवडत नाही. मलाही एक धाकटा भाऊ आहे आणि तिची बहिण त्याच्या वर्गात आहे. मी माझ्या भावाशी जसं वागतो तसंच तुझ्या बहिणीशी वागत असल्याचं मी तिला अनेकदा सांगितलं आहे. पण तिला हे पटत नाही. यामुळे आमच्यात वाद होतात. मी काय करू?

**उत्तर :**

भावंडांचं नातं अनोखं असतं. खरंतर दोन बहिणी एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी असतात. पण या दोघींच्या नात्यात काही कारणांमुळे दुरावा आला आहे का हे जाणून घे. दुसरं म्हणजे तिला तुझ्या कोणत्या गोष्टी खटकतात हे समजून घेण्याचा प्रयत्न कर. तिचे तिच्या बहिणीशी काही वाद असू शकतील. मागील काही घटनांमुळे ती असं वागत असेल. हे नातं टिकवून ठेवण्यासाठी ती असं करत असेल. त्यामुळे नेमकं काय आणि कुठे चुकतंय हे तू जाणून घ्यायला हवं. पालक आपल्या मुलांची तुलना करतात. तुझ्या प्रेयसीची तिच्या बहिणीशी तुलना होत असेल. लहानपणी घडलेल्या काही घटना तिच्या अशा वागण्याला कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे नेमकी कारणं जाणून मग पुढचा निर्णय घे. तुझ्या प्रेयसीशी मोकळेपणाने बोल.

# काळजी केसांची

ग्रुमिंग



काही घरगुती उपायांनी केस गळण्याचं प्रमाण कमी करता येईल. बीटमध्ये बरेच पोषक घटक असतात. बीटचा रस प्यायल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतात. बीट फक्त केसांसाठीच नाही तर तुमच्या सर्वांगिण आरोग्यासाठी चांगला असतो. आठवड्यातून तीन वेळा बीटचा रस प्या.

* केसांचा मसाज करणं गरजेचं आहे. तुम्ही नियमित मसाज करून घ्या. मसाजमुळे केसांची मुळं बळकट होतात. इतकंच नाही तर केस दाटही होतात.

* भृंगराज ही अत्यंत प्रभावी अशी औषधी वनस्पती आहे. भृंगराजमुळे केसांना बळकटी मिळते. त्यामुळे भृंगराजयुक्त केश तेलाचा वापर करा. या तेलाने मसाज करा. यामुळे केसांची चांगली वाढ होईल.

* अंडी हा सल्फरचा प्रभावी स्रोत आहे. केसांचा दर्जा सुधारण्यासाठी दोन अंडी फेटून त्यात चमचाभर दही घाला. हे मिश्रण केसांना लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

* मुलं रोज केस धुतात. पण हा मोह टाळा. केस गळत असतील तर आठवड्यातून दोन वेळा केस धुवा. सौम्य शँपूचा वापर करा. तुमचा शँपू तसंच कंडिशनरमध्ये पॅराबेन आणि सल्फेट असे घटक असणार नाहीत याची खात्री करा.

# शॅकेटच्या दुनियेत

फॅशन पॅशन



कपडे खरेदी आणि महिला यांचे कितीही घट्ट नाते असले तरी आजकाल पुरुषसुद्धा यात मागे नाही. 'मेल कम्युनिटी'मध्येही कपड्याच्या दररोज शेकडो नव्या फॅशन येत आहेत आणि त्यातील अनेक लोकप्रिय ठरत आहेत. बाजारात सध्या जॅकेटच्या लेटेस्ट स्टाईलचे मोठे फॅड दिसून येत असून या नव्या स्टाईलला शॅकेट म्हटले जाते. शॅकेट म्हणजे शर्टसारखे दिसणारे जॅकेट. विशेष म्हणजे लहान मुलांपासून कोणत्याची वयाच्या पुरुषांना ते शोभते. त्याना लायक्रा, नायलॉन, स्पोर्ट्स वेअर म्हणून विशेष पसंती दिली जात आहे. बोल्ड आणि न्युट्रल असे दोन्ही प्रकारात ते उपलब्ध आहे. हवामानानुसार कोणता प्रकार निवडायचा हे ठरवता येते. सध्याच्या ट्रेंडमध्ये कोबाल्ट ब्ल्यू, चेरी रेड कलर्स ऑरेंज, ग्रीन, नेव्ही ब्ल्यू सह मिक्स अँड मॅच करून वापरले जात आहेत. खाकी हिरव्या मिलिटरी शॅकेटलाही विशेष पसंती मिळत आहे. ट्रॅकपॅंटपासून ट्राऊझर किंवा टीशर्ट पासून शर्टवर ते कशावरही शोभून दिसतात. मिलिटरी शॅकेटची रंगसंगती थोडी वेगळी असते त्यामुळे कलर कॉम्बिनेशन करताना थोडी दक्षता घेतली पाहिजे, असे फॅशन डिझायनर सांगतात. हे शॅकेट क्विल्ट प्रकारातही उपलब्ध आहेत. थंडी, थोडा गारवा असेल तर त्याचा वापर सहज करता येतो.

# वायुदलातलं करिअर

करिअर

भारतीय हवाई दलाच्या एका कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणे म्हणजे लष्करात अधिकारी होण्याची शक्यता वाढते. 'इन्स्टिट्यूट ऑफ एअरोस्पेस मेडिसिन' (आयएएम) असे या कॉलेजचे नाव आहे.

'इन्स्टिट्यूट ऑफ एअरोस्पेस मेडिसिन' ही भारतीय हवाई दलाची एक प्रमुख संस्था आहे. हे देशातील एअरोस्पेस वैद्यकीय ॲक्टिव्हिटीजचे केंद्र आहे. या संस्थेची स्थापना २९ मे १९५७ रोजी झाली. त्या वेळी ते 'स्कूल ऑफ एव्हिएशन मेडिसिन' म्हणून ओळखले जात होते. पहिले कमांडिंग ऑफिसर विंग कमांडर आर. अरुणाचलम होते. सैन्यदलातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'एव्हिएशन मेडिसिन'चे प्रशिक्षण देणे, एअरक्रूला एव्हिएशन मेडिसिनची माहिती पुरवणे आणि एअरोमेडिकल समस्यांवर संशोधन करणे, हा या संस्थेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. याशिवाय 'एचएएल' (हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमि टेड) ला विमानांच्या डिझाइन आणि डेव्हलपमेंटमध्ये ही संस्था तांत्रिक मदत करते.



**एअरफोर्स कॉलेजमध्ये प्रवेश पात्रता**

'इन्स्टिट्यूट ऑफ एअरोस्पेस मेडिसिन' (आयएएम) मध्ये २०२५ ची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे प्रवेश परीक्षांवर आधारित आहे. ही संस्था एरोस्पेस मेडिसिन क्षेत्रात स्पेशलायझेशन देते आणि ३ वर्षांचा एमडी प्रोग्राम चालवते. 'आयएएम' मध्ये 'एम डी' प्रोग्राममध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना नीट पीजी परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवार संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करू शकतात.

'एमडी' अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी निवड नीट पीजीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाते. संस्थेतील जागांची उपलब्धता आणि उमेदवारांची गुणवत्ता यादी लक्षात घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. उमेदवाराकडे नीट पीजीमध्ये वैध गुण असणे आवश्यक आहे. इतर आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि वैद्यकीय पदवीसंबंधित निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे. शिक्षण कुठेही घेतले, तरी त्याचा अभ्यासक्रम नीट समजून घेणे गरजेचे आहे.

# धार्मिक पर्यटनाचा ट्रेंड


भटकंती

पूर्वी लोक डिसेंबर ते फेब्रुवारी महिन्यात कुलु-मनाली किंवा सिमला अशा थंड हवेच्या ठिकाणी जात होते. यंदाच्या हिवाळ्यात मात्र हा ट्रेंड बदलत चालला असून लोक धार्मिक पर्यटनाकडे वळले आहेत. नवीन आकडे पाहिले तर पार्टी किंवा बीचवर मौजमजा करण्याऐवजी आता लोक वर्षअखेरची सुट्टी धार्मिक पर्यटनस्थळावर घालवणे पसंत करत आहेत.

अयोध्या, वाराणसी, ऋषिकेश, अमृतसरसारख्या ठिकाणी आता पर्यटकांचा ओढा वाढला आहे. गेल्या एक वर्षांपासून धार्मिक पर्यटन वाढले आहे. नवीन वर्ष साजरे करण्यासाठी आता धार्मिक स्थळांवर जाऊन मन:शांती मिळवली जात आहे. केवळ वयस्कर लोकच नव्हे, तर तरुणांचा देखील आता आध्यात्मिक अनुभव घेण्यासाठी तीर्थस्थळांकडे ओढा वाढला आहे. काही जण धार्मिक स्थळांजवळील ट्रेकींगला प्राधान्य देत आहेत.

**टूर्स ऑपरेटर्सचे नवीन पॅकेज लॉंच**

धार्मिक स्थळांना वाढती मागणी पाहून ट्रॅव्हल कंपन्यांनी देखील नवीन पॅकेज लॉंच दाखल केले आहेत. थॉमस कूक टूर्स अँड ट्रॅव्हलर्सच्या माहितीनुसार मथुरा, उदयपूर, बनारस येथील काशीविश्वनाथ मंदिर आणि मदुरईच्या मीनाक्षी मंदिरासाठी बुकींग वेगाने वाढले आहे. यामुळे थॉमस कुक आणि 'एसओटीसी'ने या वर्षी सुमारे अर्धा डझन नवीन धार्मिक पॅकेज लॉंच केले आहे. त्यात काशी विश्वनाथ-काठमांडू पाच ज्योतिर्लिंग दर्शन, त्रिची, तंजौर, चिदंबरम, तिरुपती आणि चेन्नईसारख्या स्थळांचा समावेश आहे.



**यात्रा मोबाईल ॲप चे काय म्हणणे ?**

'लेक्झिगो' च्या मते वाराणसी, तिरुपती आणि अयोध्येसाठी फ्लाईट बुकींग यंदा २५ ते ३० टक्के वाढली आहे. तिरुपती आणि भद्राचलम केवळ सर्च ५० ते ५५ टक्के वाढली आहेत. तसेच बुकींग डॉट कॉम नुसार वाराणसी आणि पुरीसाठी नोव्हेंबर ते डिसेंबरमध्ये सर्च ४० टक्के वाढली आहे.

**कोणत्या तिर्थस्थळाला आहे जास्त मागणी ?**

'क्लिअर ट्रिप' च्या डेटानुसार या वेळी वाराणसी, ऋषिकेश, हरिद्वार आणि अमृतसर सर्वात जास्त ट्रेंडम ध्ये आहे. उत्तर प्रदेशातील अयोध्या, वाराणसी, प्रयागराज, मथुरा-वृंदावन यासारख्या मोठ्या धार्मिक केंद्रांना मोठी मागणी आहे. या वर्षी पर्यटकांच्या संख्येने गेल्या वर्षीचा रेकॉर्ड मोडला आहे.


**धार्मिक पर्यटनचा ट्रेंड का वाढला ?**

धार्मिक जागी जाण्याचे प्रमाण वाढण्याम ागे अनेक कारणे आहेत. आध्यात्मिक पर्यटनाचा बाजार वेगाने वाढत आहे. २०२३ मध्ये सुमारे १ अब्ज डॉलर आध्यामिक पर्यटनाचा बाजार होता. हा बाजार साल २०३३ पर्यंत ४.६ अब्ज डॉलरपर्यंत पोहचला आहे. वर्षाच्या अखेर सुट्ट्या मिळताच लोक प्रदीर्घ आणि शांतता असलेली प्रवास ठिकाणे निवडतात. या शिवाय रस्ते, सुविधा आणि धार्मिक जागी होत असलेल्या नव्या विकासामुळे प्रवाशांना चांगला अनुभव दिला आहे. तसेच 'सोशल मीडिया'वरदेखील आध्यात्मिक स्थळाचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्याचा ट्रेंड वाढत आहे.

# ईव्ही देखभालीचे क्षेत्र

करियर

इलेक्ट्रिक वाहनांमध्ये (ईव्ही) प्राथमिक इंधन म्हणून वीज वापरतात. सर्व-इलेक्ट्रिक वाहनांना बॅटरी इलेक्ट्रिक वाहने आणि प्लग-इन हायब्रीड इलेक्ट्रिक वाहने असेही म्हणतात. यापैकी काही वाहनांमध्ये अजूनही वीजेसोबत द्रव इंधन वापरत असले, तरी त्यांना इलेक्ट्रिक कार किंवा फक्त इलेक्ट्रिक वाहन म्हणून ओळखले जाते. इलेक्ट्रिक वाहने त्वरित टॉर्क, आवाजविरहित ड्रायव्हिंग आणि शून्य प्रदूषण या विशेष गुणधर्मांमुळे स्वीकारल्या जात आहेत. यापुढे या वाहनांची संख्या वाढतच जाणार असून त्यांच्या देखभाल आणि दुरुस्तीचे नवे क्षेत्र उदयास येत आहे. तरुणांनी याचे व्यावसायिक शिक्षण घेऊन या क्षेत्रात कारकिर्द करण्याचा विचार करावा.



**इलेक्ट्रिक वाहनांची कार्यरचना**

इलेक्ट्रिक वाहनांमध्ये पारंपरिक इंजिन नसते. केवळ बॅटरीमध्ये साठवलेल्या ऊर्जेद्वारे चालविल्या जाणाऱ्या एक किंवा अधिक इलेक्ट्रिक मोटर्सद्वारे ही वाहने चालवली जातात. बॅटरी-वाहनाला विद्युत ऊर्जा स्त्रोतामध्ये प्लग करून चार्ज केले जाते, तसेच रिजनरेटिव्ह ब्रेकिंगद्वारेदेखील चार्ज केली जाऊ शकतात. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये सामान्यतः पारंपारिक वाहनांपेक्षा कमी ड्रायव्हिंग रेंज असते. इलेक्ट्रिक वाहनांची ग्रेड ड्रायव्हिंग परिस्थिती आणि सवयींनुसार बदलते. अति तापमानाम ुळे रेंज कमी होते कारण बॅटरीमधून मिळणारी ऊर्जा मोटरला पॉवर देण्याव्यतिरिक्त हवामान नियंत्रण प्रणालींना पॉवर देते. वेग, धोकादायक ड्रायव्हिंग आणि जड भार रेंज कमी करू शकतात.

इलेक्ट्रिक वाहने स्वीकारण्यात आव्हाने आणि अडचणी

* पायाभूत सुविधा आणि उच्च किंमत.

* सध्याच्या काळात चार्जिंग स्टेशनची कमतरता आहे. विशेषतः बिनशहरी भागांमध्ये चार्जिंगसाठी सुविधा अजूनही विकसित झाल्या नाहीत.

* बॅटरीची समस्या

इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरीची कार्यक्षमता ही सद्य:स्थितीमधील प्रमुख समस्या आहे. बॅटरी महागड्या, जड असतात आणि त्यांना वारंवार चार्जिंगची आवश्यकता असते, ज्यामुळे त्या दैनंदिन वापरासाठी कमी व्यावहारिक बनतात.

या समस्या सोडवण्यासाठी सक्रियपणे कार्यक्षम बॅटरी तंत्रज्ञान विकसित करणे अशक्य आहे. त्यात ड्रायव्हिंग रेंज वाढवणे, वजन कमी करणे, खर्च कमी करणे आणि चार्जिंग वेळ कमी करणे यांचा समावेश होतो. बॅटरी तंत्रज्ञान शेवटी बाजारात इलेक्ट्रिक वाहनांचे यश किंवा अपयश ठरवेल.

**बॅटरी तंत्रज्ञानातील संशोधन**

सध्याच्या बॅटरी तंत्रज्ञानामध्ये लिथियम, निकेल आणि कोबाल्टचा वापर केला जातो, त्यांची ऊर्जा घनता तुलनेने कमी असते. वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यामध्ये वाजवी प्रमाणात ऊर्जा साठवून ठेवल्याने ती जड आणि महागडी बनतात. नवीन बॅटरी तंत्रज्ञानावर, प्रामुख्याने सोडियम वापरण्यावर, संशोधन जगभरात सुरू आहे.

# अहिल्यानगरच्या दिया छाजेड व इशिका अडसूळ यांचा जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिपवर 'भारताचा झेंडा'

## उत्तर युरोपातील एस्टोनियात ७० देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागे टाकत जगात प्रथम क्रमांक पटकविला

नगर – उत्तर युरोप खंडातील एस्टोनिया देशात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत यावर्षी अहिल्यानगरच्या दिया प्रीतम छाजेड व इशिका अभिजीत अडसूळ या दोन भारतीय विद्यार्थिनींनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. जगातील ७० प्रगत देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोघींनीही सर्व फेऱ्या यशस्वीरीत्या पार करत प्रथम क्रमांक पटकावून जगात 'नंबर वन' होण्याचा मान मिळवला आहे.



उत्तर युरोपातील एस्टोनिया देशात जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतातील अहिल्यानगर मधील दिया छाजेड, इशिका अडसूळ यांनी प्रथम क्रमांक मिळवून भारताचा तिरंगा उंचविला. समवेत वडील प्रीतम छाजेड, आई शितल छाजेड आदि उपस्थित होते.

यापूर्वी भारतात पार पडलेल्या राष्ट्रीय रोबोटिक्स स्पर्धेत दियाने दैदीप्यमान यश मिळवले होते. पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर येथील एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावत आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. तिच्यासोबत इशिका अडसूळ हिनेही राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करत जागतिक स्पर्धेचे दार खुले केले होते. एस्टोनिया येथे झालेल्या या जागतिक स्पर्धेत दहा विविध कॅटेगिरींमध्ये, सर्व वयोगटांतील स्पर्धक सहभागी झाले होते. अमेरिका, युरोप व आशिया खंडातील प्रगत देशांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज संघ या स्पर्धेत उतरले होते. मात्र, नावीन्यपूर्ण कल्पना, अचूक सादरीकरण व आत्मविश्वासाच्या जोरावर दिया व इशिका यांनी या प्रगत देशांच्या प्रमुख संघांनाही पराभूत करत अंतिम विजेतेपद मिळवले.

दियाने तयार केलेला मोबाईलवर ऑपरेट होणारा शेतीसाठी उपयुक्त रोबोट हा या स्पर्धेतील विशेष आकर्षण ठरला. हा रोबोट पेरणी, फवारणी व नांगरणी यासारखी अनेक शेतीकामे एकाच यंत्राद्वारे करू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन कष्टही मोठ्या प्रमाणात कमी होतात. तापमान, हवामानातील बदल व वातावरणातील आर्द्रता मोजण्याची क्षमताही या रोबोटमध्ये आहे.

दिया छाजेड हिने सांगितले की, भारत हा कृषीप्रधान देश आहे. अन्न हे जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. ते अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांना अपार कष्ट करावे लागतात. शेतकऱ्यांचे कष्ट कमी करून कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळेल, या उद्देशानेच मी हा रोबोट तयार केला. पणजोबा, आजोबा, वडील हे शेतकरी असल्याने शेतकऱ्यांविषयी आपुलकी व प्रेम असल्याचेही तिने नमूद केले.

या यशाबद्दल दोघींना मिळून १ लाखांचे रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात आले असून, लवकरच सुवर्णपदकही प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती या दोघींनी दिली. मूळची अहिल्यानगरची असलेली दिया सध्या बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या विनोदकुमार गुजर बाल विकास मंदिर प्रशालेत इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या या प्रवासात आई शितल छाजेड, वडील प्रीतम छाजेड तसेच शाळेतील शिक्षिका आस्मा मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. इशिका अडसूळ हिलाही पालक व शिक्षकांचे भक्कम पाठबळ लाभले आहे.

# रक्तदानातून मानवतेचे नाते तयार होते

## निखिलेंद्र लोढा यांचे प्रतिपादन; जयकुंवरबाई मोतीलाल लोढा स्मरणार्थ रक्तदान शिबिराला प्रतिसाद





जेएम ग्रुपच्या वतीने एमआयडीसी येथील जेएम अॅल्युमिनियम कंपनीत रक्तदान शिबीर घेण्यात आले.

नगर – आधुनिक विज्ञान युगातही माणसाला कृत्रिम रक्त तयार करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे अत्यवस्थ रूग्ण, थॅलेसेमिया आजार असलेल्या रूग्णांसाठी एखाद्याने केलेले रक्तदानच महत्त्वाचे ठरते. रक्तदानातून मानवतेचे नाते तयार होते. साधूसतांनी हीच मानवतेची शिकवण दिली आहे. आमच्या मातोश्री जयकुंवरबाई लोढा यांची राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्यावर नितांत श्रध्दा होती. त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून दरवर्षी रक्तदान शिबीर घेण्यात येते. यंदाही या शिबिराला प्रतिसाद मिळाला आहे, असे निखिलेंद्र लोढा यांनी म्हटले.

जेएम ग्रुपच्या वतीने एमआयडीसी येथील जेएम अॅल्युमिनियम कंपनीत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराचा प्रारंभ लोढा परिवारातील निखिलेंद्र लोढा, मनिषा लोढा, सुदर्शन लोढा, संजना लोढा यांनी रक्तदान करून केला. यावेळी कंपनीचे राजेश पेवाल, अभिजीत साळवे, उषा शिंदे, राजू दावभट, आनंदऋषीजी ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी सुनील महानोर आदी उपस्थित होते.

शिबिराला कंपनीतील स्टाफ, कामगारांनी प्रतिसाद देत उत्स्फूर्त रक्तदान केले. आनंदऋषीजी ब्लड बँकेच्या टिमने रक्त संकलन केले. प्रास्ताविक राजू दावभट यांनी केले.

लोढा पुढे म्हणाले, घरात आई वडिलांचे सुसंस्कार असतील तर संपूर्ण कुटुंब उत्कर्ष साधते. वडीलधारी मंडळी कुटुंबाचा आधारवड असतात. त्यांच्या छत्र छायेखाली जीवनात कोणत्याही प्रसंगात खंबीर राहण्याची तसेच समाजाप्रती बांधिलकी जपण्याची दृष्टी मिळते. आमच्या मातोश्री जयकुंवरबाई मोतीलाल लोढा यांनी असेच संस्कार आमच्यावर केले. गरजूंना मदत करण्याची शिकवण त्यांनी दिली. आमचे घर आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळच असल्याने अनेक गरजू रूग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना त्या मदतीचा हात द्यायच्या, असे लोढा यांनी सांगितले.

सर्व कर्मचाऱ्यांनी दरवर्षी असेच रक्तदान करण्याचा संकल्प केला. शिबिरात १५१ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. मेघा कासार व अनिता राऊत यांनी आभार मानले.





## बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना ब्लँकेटसचे वाटप

सध्या वाढत्या थंडीमुळे गरजुंना मायेची ऊब देण्याच्या दृष्टीने तपोवनरोड येथील बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना ब्लँकेटसचे जायका होटलचे संचालक नईम सरदार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी बालघरचे युवराज गुंड, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान आदी उपस्थित होते.

# श्री साईदास परिवाराच्या पालखी रथाच्या शेडचे भूमीपूजन

## अॅड. धनंजय जाधव यांनी उपलब्ध करुन दिली जागा; २५ वर्षांची अखंड साईभक्ती परंपरेला हातभार

नगर – मागील पंचवीस वर्षांपासून अहिल्यानगर ते श्रीक्षेत्र शिर्डी असा श्री साईदास परिवाराचा पालखी सोहळा अखंड भक्तीभावाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. या पालखीतील श्री साईंच्या भव्यरथाच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी श्री साईभक्त अॅड. धनंजय जाधव यांनी जागा उपलब्ध करून दिली असून, त्या ठिकाणी पालखीसाठी शेड उभारण्याच्या कामाचे भूमीपूजन नुकतेच पार पडले.



श्री साईदास परिवाराच्या पालखी रथाच्या शेडचे भूमीपूजन करताना अॅड. धनंजय जाधव आदी.

धनंजय जाधव यांनी ही जागा भाडेतत्त्वावर पूर्णतः विनामूल्य उपलब्ध करून दिली असून, त्यांच्या हस्ते शेड उभारण्याच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. या भूमीपूजन कार्यक्रमाला ट्रस्टचे अध्यक्ष अजय काळे, विश्वस्त शंकर बोरुडे, प्रकाश म्हस्के, संजय बनसोडे, निशिकांत शिंदे, दत्ता डोळसे, विजय चौधरी, विजय शिंदे, तावरे, व्यंकटेश जोशी, लक्ष्मीकांत तिवारी, सोनू बोरुडे, धनंजय मडके उपस्थित होते.

ट्रस्टचे अध्यक्ष अजय काळे म्हणाले की, गेल्या पंचवीस वर्षांपासून श्री साईदास परिवाराच्या वतीने अहिल्यानगर ते श्रीक्षेत्र शिर्डी अशी पालखी भक्तीभावाने, सेवाभावाने आणि श्रद्धेने काढली जाते. या धार्मिक आणि सामाजिक कार्याला धनंजय जाधव यांचे पाठबळ लाभत असून, त्यांनी दिलेल्या विनामूल्य जागेमुळे पालखी सेवेला मोठी मदत होणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी निशिकांत शिंदे यांनी उपस्थित सर्व साईभक्त आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.

# विजयदिन

## भारतीय शौर्य, एकता आणि आत्मसन्मानाचा गौरव

१६ डिसेंबर हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनात अभिमान, आत्मविश्वास आणि ऐतिहासिक स्मृतींनी भारलेला दिवस आहे. हा दिवस 'विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात निर्णायक विजय मिळवला आणि बांगलादेश या स्वतंत्र राष्ट्राचा जन्म झाला. हा विजय केवळ रणांगणावर मिळालेला लष्करी विजय नव्हता, तर तो भारतीय राष्ट्रशक्तीचा, राजकीय दूरदृष्टीचा आणि मानवी मूल्यांवरील ठाम विश्वासाचा परिणाम होता. म्हणूनच विजय दिन हा केवळ सैन्याच्या शौर्याचा उत्सव नसून, तो संपूर्ण देशाच्या एकतेचा, त्यागाचा आणि आत्मसन्मानाचा ऐतिहासिक साक्षीदार आहे.

१९७१ च्या युद्धाची पार्श्वभूमी समजून घेतल्यास विजय दिनाचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. तत्कालीन पाकिस्तान भौगोलिकदृष्ट्या दोन वेगळ्या भागांमध्ये विभागलेला होता त्यामध्ये पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे दोन भाग होते. भौगोलिक अंतरासोबतच या दोन भागांमध्ये भाषिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक दरी खोल होती. पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक लोकसंख्या बहुसंख्य असूनही सत्ता, प्रशासन आणि लष्करावर पश्चिम पाकिस्तानचे वर्चस्व होते. पूर्व पाकिस्तानावर सातत्याने अन्याय, भेदभाव आणि दडपशाही केली जात होती. लोकशाही मार्गाने व्यक्त झालेल्या जनतेच्या इच्छेचा अवमान करण्यात आला. या अन्यायाविरोधात उठलेला आवाज दडपण्यासाठी अमानुष अत्याचार करण्यात आले, ज्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली होती.

या दडपशाहीचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसला. लाखो लोकांची कत्तल झाली, महिलांवर अमानवी अत्याचार झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. या भयावह परिस्थितीमुळे सुमारे एक कोटी निर्वासित भारतात आश्रयासाठी आले. हा केवळ सीमावर्ती प्रश्न नव्हता, तर तो भारतासमोरील एक मोठे मानवी आणि राष्ट्रीय आव्हान होते. भारताने या संकटाकडे केवळ शेजारी राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न म्हणून पाहिले नाही, तर मानवी दृष्टिकोनातून त्याची दखल घेतली. निर्वासितांसाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसेवा आणि सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली. या काळात भारतीय समाजाने दाखवलेली करुणा आणि सहिष्णुता ही भारताच्या सांस्कृतिक मूल्यांची साक्ष देणारी ठरली.

या परिस्थितीत भारताने युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सहज किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक दबाव असतानाही भारताने अन्यायाविरोधात उभे राहण्याची भूमिका घेतली. ३ डिसेंबर १९७१ रोजी युद्धाला सुरुवात झाली आणि भारतीय सैन्याने अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि धैर्याने युद्ध लढले. भारतीय लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे युद्धाची दिशा लवकरच भारताच्या बाजूने झुकली. अवघ्या तेरा दिवसांत युद्धाचा निर्णायक शेवट झाला आणि १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली. सुमारे ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्र खाली ठेवली. आधुनिक युद्धइतिहासातील ही सर्वात मोठ्या शरणागतींपैकी एक मानली जाते.

विजय दिन हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा, शिस्तीचा आणि त्यागाचा गौरव करणारा दिवस आहे. देशाच्या सीमेवर उभे राहून सैनिकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता मातृभूमीचे रक्षण केले. अनेक जवानांनी आपले सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळेच आज भारत सुरक्षित, स्वाभिमानी आणि सार्वभौम आहे. विजय दिन साजरा करताना या शहीदांचे स्मरण करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी सहन केलेला त्याग आणि वेदना कधीही विसरता कामा नयेत.

या विजयामागे केवळ सैन्याची ताकद नव्हती, तर संपूर्ण देशाची एकजूट होती. युद्धकाळात देशातील नागरिकांनी अभूतपूर्व संयम आणि राष्ट्रभक्ती दाखवली. राजकीय मतभेद, प्रादेशिक भिन्नता आणि सामाजिक अंतर बाजूला ठेवून संपूर्ण देश एकसंधपणे उभा राहिला. उद्योगधंदे, शेतकरी, कामगार, आरोग्य कर्मचारी, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांनी आपल्या परीने राष्ट्रहितासाठी योगदान दिले. ही एकजूटच भारताची खरी ताकद आहे, हे १९७१ च्या युद्धाने स्पष्टपणे दाखवून दिले.

विजय दिन हा भारताच्या राजकीय परिपक्वतेचेही प्रतीक आहे. युद्ध जिंकल्यानंतर भारताने अहंकार, सूडभावना किंवा आक्रमक धोरण स्वीकारले नाही. युद्धकैद्यांशी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार मानवी वागणूक देण्यात आली. शिमला कराराच्या माध्यमातून शांततेचा आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्यात आला. ही भूमिका भारताच्या शांततावादी आणि जबाबदार राष्ट्र म्हणून असलेल्या प्रतिमेला अधिक बळ देणारी ठरली. सामर्थ्य असूनही संयम राखणे आणि स्थैर्याला प्राधान्य देणे, हीच भारताची खरी ओळख आहे.

आजच्या काळात विजय दिनाचे महत्त्व अधिक व्यापक स्वरूपात समजून घेण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर वाढते संघर्ष, युद्धसदृश परिस्थिती आणि अस्थिरता पाहता १९७१ चा विजय आपल्याला आत्मविश्वास देतो. तो आपल्याला आठवण करून देतो की, भारत कोणत्याही संकटाला समर्थपणे सामोरे जाण्याची क्षमता राखतो. विजय दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव नसून तो वर्तमान आणि भविष्याचा आत्मविश्वास आहे.

विजय दिन युवकांसाठी विशेष प्रेरणादायी ठरतो. आजचा युवक उद्याचा भारत घडवणार आहे. या दिवसातून त्याला देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि त्यागाची शिकवण मिळते. सैन्यात भरती होणे हीच देशसेवा नाही, तर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे, समाजात सकारात्मक बदल घडवणे आणि राष्ट्रीय एकतेचे जतन करणे हेही देशसेवेचेच स्वरूप आहे. विजय दिन युवकांमध्ये जबाबदारीची जाणीव जागवतो.

विजय दिन साजरा करताना तो केवळ औपचारिक कार्यक्रम, परेड किंवा भाषणांपुरता मर्यादित ठेवू नये. स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सार्वभौमत्व सहज मिळालेले नसून त्यासाठी असंख्य बलिदानांची किंमत मोजावी लागलेली आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. राष्ट्राच्या एकतेला, अखंडतेला आणि सुरक्षिततेला बाधा पोहोचवणाऱ्या शक्तींविरोधात सजग राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

विजय दिन हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. हा दिवस आपल्याला अभिमानाने मान उंचावायला शिकवतो, पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही करून देतो. शौर्य, शिस्त, एकता आणि शांततेचा संदेश देणारा विजय दिन प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक दृढ करतो. १६ डिसेंबर हा दिवस केवळ स्मरणाचा नसून संकल्पाचा दिवस आहे. भारताच्या सुरक्षित, समृद्ध आणि सशक्त भविष्यासाठी एकजुटीने पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच विजय दिन हा भारतीय शौर्याचा, आत्मसन्मानाचा आणि इतिहास घडविणाऱ्या विजयाचा अमर उत्सव आहे.



– डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



शहरातील प्रोफेसर कॉलनी चौकात उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी आ.संग्राम जगताप. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी)

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्यावतीने प्रोफेसर चौकात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण

नगर – शहरातील प्रोफेसर कॉलनी चौकात महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे प्राथमिक अनावरण सोमवारी दुपारी आ.संग्राम जगताप यांनी वेद्मुर्तींच्या मंत्रोच्चारात पूजा करून केले. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अनिल शिंदे, माजी उपमहापौर गणेश भोसले, पुतळा कृती समितीचे अजिंक्य बोरकर, सतीश बारस्कर, मराठा महासंघाचे सुरेश इथापे, जिजाऊ ब्रिगेडच्या स्वाती जाधव, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, गणेश कवडे, प्रा. माणिकराव विधाते, अजिंक्य बोरकर, निखील वारे, सतीश बारस्कर, बाळासाहेब पवार, विनीत पाऊलबुद्धे, विपुल शेटिया, विकी जगताप, उद्योजक राजेश भंडारी, आशिष पोखरणा, इंजि. सुरेश इथापे, इंजि. केतन क्षीरसागर, अरविंद शिंदे, राजेंद्र ससे, गोरख दळवी, संगीता खरमाळे, रेश्मा आठरे यांच्यासह माजी नगरसेवक तसेच शिवप्रेमी नागरिक व महायुतीतील पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी ढोल ताशांच्या गजरात छत्रपतींच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या.

आ.संग्राम जगताप पुढे म्हणाले, अहिल्यानगर शहरात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारणी व अनावरण होणे हा सर्वात आनंदाचा क्षण व सुवर्णाक्षरांनी लिहिणाचा दिवस आहे. हा सोहळा प्राथमिक अनावरण सोहळा आहे, १६ डिसेंबरला ठरल्याप्रमाणे सकल मराठा व सकल शिवप्रेमींच्यावतीने सोहळ्याने या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे. धर्मरक्षक संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी अनेकांनी संघर्ष केला, आंदोलन केले, राजू ससे यांनी उपोषण केले. तत्कालीन नगरसेवक कैलास गिरवले यांनी महानगरपालिकेत ठराव केला. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीनेही वेळोवेळी मागणी केली गेली. आता सर्वांची इच्छा व स्वप्न पूर्ण झाले आहे. पुतळा उभा राहिल्याने प्रत्येकाला मनापासून आनंद झाला आहे. नगर शहरात भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीचे काम झाले आहे. आता लवकरच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे काम लवकरच सुरू करू. पुतळे हे प्रेरणा देणारे व शहराची ओळख निर्माण करणारे स्मारके आहेत. या पुतळ्यामुळे शहराच्या वैभवात भरच पडली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळा उभारणीसाठी ज्यांनी ज्यांनी संघर्ष केला त्या सर्वांचे आभार मानतो. वेळोवेळी पालिकेच्या आयुक्तांनी व अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

सुरेश इथापे यांनी स्वागत केले. अनिल मोहिते, गणेश कवडे, ज्योती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. अजिंक्य बोरकर यांनी आभार मानले.

उद्धव काळापहाड यांनी सूत्रसंचालन केले. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र तातडीने सुरू करावे : रघुनाथ ठोंबरे



नगर – यावर्षी झालेल्या अतीवृष्टीमुळे सोयाबीन व कांदा पिकांचे अती नुकसान झालेले आहे. शेतामध्ये साठलेल्या पावसाच्या पाण्यामधून सोयाबीन काढणीचे परिश्रम शेतकरी बांधवांनी मोठ्या कष्टाने घेतले आहेत. या सोयाबीनची खरेदी शासकीय केंद्रामधून होणे शेतकरी हिताचे ठरणार आहे. वस्तुस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी भाजपचे रघुनाथ ठोंबरे यांनी केली आहे.

अतीवृष्टीमुळे सोयाबीनचे निम्मे अधिक नुकसान झालेलेच आहे! दिवाळीसणातच शासनाचे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू होणे अपेक्षित होते. ते सुरू न झाल्याने शेतकऱ्यांनी दिवाळी सणाची आर्थिक गरज भागवण्यासाठी नाईलाजाने व्यापाऱ्यांना कवडीमोल किंमतीमध्ये सोयाबीन विकले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. शेतकऱ्यांना सावरण्यासाठी शासनाने किमान आता तरी अत्यंत गांभिर्याने आणि प्राधान्याने शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे, अशीही मागणी रघुनाथ ठोंबरे यांनी केली आहे.

